
◆ १ वर्ष - ४ ◆ अंक - ३४६ ◆ पृष्ठे - ४ ◆ RNI NO. MAHMAR/2020/79677 ◆ ISSN NO. - 2582-9971 ◆ EPAPER.BHARATSANGRAM.ONLINE ◆ मुख्य संपादक : माधव आ. हिवाळे मो.नं. 9765332897

दैनिक वाशिम, बुधवार २३ एप्रिल २०२५ सत्याचा बुलंद आवाज

# भारत संग्राम

TRENDING NEWS



बॉलीवूड स्टार्सची प्रॉपर्टीजमध्ये उलाढाल:अक्षयने त्याचे ऑफिस विकले, सैफने दोहामध्ये घर घेतले, आमिरने 9 कोटींना फ्लॅट खरेदी केला

■ पान ३ वर

## थोडक्यात

### एकास बेदम मारहाण

**यवतमाळ:** धक्का लागल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून तिघांनी संगनमत करून एका व्यक्तीला शिवीगाळ केली. तसेच, जीवे मारण्याची धमकी देऊन थापडबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले. मंगेश चंपत कनाके (वय ३९, रा. मोठे वडगाव) यांच्या फिर्यादीवरून यवतमाळ शहर पोलिसांनी मोहन पेदार (वय २१), रमेश परचाके (वय २७, दोन्ही रा. जांब) आणि एका अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना भावे मंगल कार्यालयात १८ एप्रिल रोजी दुपारी घडली. पोलीस अज्ञात तिसऱ्या आरोपीचा शोध घेत आहेत.

### विद्युत तारांची चोरी

**यवतमाळ:** येथील शासकीय रुग्णालयाच्या वैद्यकीय अभिलेख विभागाच्या छतावरील टिनपत्रे काढून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला. चोरट्याने कार्यालयातील विद्युत तार आणि लहान इलेक्ट्रिक डीपीमधील अंदाजे २० हजार रुपये किमतीची तांब्याची तार चोरून नेली. तसेच, वैद्यकीय अभिलेखांचे नुकसान केले. डॉ. शरद प्रकाश राखुंडे (वय ४१, रा. श्रीकृष्ण नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून यवतमाळ शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना ११ एप्रिल ते १५ एप्रिल दरम्यान घडली. पोलीस तपास करत आहेत.

### ट्रॅव्हल्स पलटी, १५ प्रवासी जखमी

**यवतमाळ:** भरधाव वेगात आणि निष्काळजीपणे ट्रॅव्हल्स चालवल्याने इचोरी घाटाच्या वळणावर ती पलटी होऊन अपघात झाला. यात वाहनातील फिर्यादीसह १५ प्रवासी गंभीर जखमी झाले. आयुश गणेश गाताडे (वय १८, रा. वणी) यांच्या फिर्यादीवरून यवतमाळ ग्रामीण पोलिसांनी ट्रॅव्हल्स चालक उमेश मधुकर गवळी (वय ५०, रा. पांढरकवडा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ट्रॅव्हल्स क्रमांक एमएच ३४ बीजी ००७७ यवतमाळहून दारव्हाकडे जात असताना १९ एप्रिल रोजी सकाळी हा अपघात झाला. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

### कचरा फेकण्याच्या वादातून मारहाण

**दारव्हा:** घरासमोर कचरा फेकण्याच्या कारणावरून झालेल्या भांडणात मध्यस्थी करणाऱ्या पतीला आणि भाच्याला तिघांनी शिवीगाळ केली. तसेच, थापडबुक्क्यांनी मारहाण करून भाच्याला काठीने डोक्यावर मारून जखमी केले. सलमा परवीन महमद राजी (वय २५, रा. ताजनगर) यांच्या फिर्यादीवरून दारव्हा पोलिसांनी गुल्नाज रफिकोद्दीन (वय ३५), रफिकोद्दीन शकीबोद्दीन (वय ३७) आणि शेख अमीर शेख रोशन (वय ३८, सर्व रा. ताजनगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना ताजनगर येथे १९ एप्रिल रोजी सकाळी घडली.


### दुचाकीच्या धडकेत पती-पत्नी जखमी

**लाडखेड:** भरधाव वेगात आणि निष्काळजीपणे मोटारसायकल चालवून पतीच्या दुचाकीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात पती-पत्नी दोघेही जखमी झाले. सौ. मयुरी दिवाकर इंगोले (वय ३०, रा. सोनखास) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून लाडखेड पोलिसांनी मोटारसायकल (क्र. एमएच २९ सीडी ९९५९) चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी आणि त्यांचे पती त्यांच्या मोटारसायकलने (क्र. एमएच २९ एक्स ४८८६) शेतात जात असताना उत्तर वाढोणा येथे १८ एप्रिल रोजी दुपारी हा अपघात झाला.

# अतिरेकी हल्ल्यात राज्यातील दोघांचा मृत्यू

## अतिरेक्यांच्या गोळीबारात 26 जण ठार; मुख्यमंत्री फडणवीसांनी केला निषेध

भारत संग्राम | प्रतिनिधी



**मुंबई :** मंगळवारी दुपारी 3 वाजता जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार केला. या हल्ल्यात 26 पर्यटकांचा मृत्यू झाला. यामध्ये 2 परदेशी पर्यटकांचाही समावेश आहे. सुरुवातीला प्रशासनाने फक्त एका मृत्यूची पुष्टी केली होती, सुमारे 4 तासांनंतर त्यांनी 26 मृत्यू स्वीकारले. मीडिया रिपोर्ट्सनुसार, दहशतवाद्यांनी प्रथम एका पर्यटकाला त्याचे नाव विचारले, नंतर त्याच्या डोक्यात गोळी झाडली आणि तिथे उपस्थित असलेल्या इतर पर्यटकांवर गोळीबार करत पळून गेले. लष्कर-ए-तैयबाने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली आहे. ही घटना पहलगामच्या बैसरन व्हॅलीमध्ये घडली, ज्यामध्ये 20 लोक जखमी झाले. त्यापैकी काही स्थानिक देखील आहेत.

यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया देत श्रद्धांजली वाहिली आहे. फडणवीस म्हणाले, पहलगाममध्ये झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा मी तीव्र शब्दात निषेध करतो. या घटनेत जे लोक मृत्यूमुखी पडले, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांच्या कुटुंबीयांच्या, आप्तस्वकियांच्या दु:खात आम्ही सहभागी आहोत. या घटनेत जे जखमी झाले, त्यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. जम्मू-काश्मीर प्रशासनातील वरिष्ठांच्या आम्ही संपर्कात आहोत. पहलगाम ज्यांच्या अखत्यारीत येते, ते काश्मीरचे विभागीय आयुक्त विजयकुमार बिदरी यांनाही फोन करुन माहिती घेतली. आतापर्यंत प्राप्त माहितीनुसार, महाराष्ट्रातील दोन पर्यटकाचा मृत्यू झाला असून, त्यात दिलीप डिसले, अतुल मोने असे दोघे आहेत. स्थानिक प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, या दहशतवादी हल्ल्यात महाराष्ट्रातील 2 जण जखमी झाले आहेत. त्यातील एक माणिक पटेल हे पनवेलचे आहेत. एस. भालचंद्रराव हे दुसरे जखमी आहेत. सुदैवाने दोघांचीही प्रकृती स्थिर आहे. पहलगाममध्ये हा सर्वात मोठा हल्ला झालेला आहे. मी याचा निषेध करतो. यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाचे कणखर गृहमंत्री अमित शाहांना तिथे पाठवलं आहे. मी इतकंच सांगतो की निरपराध पर्यटकांना मारण्यात कोणती मर्दानगी आली आहे. हा भ्याड हल्ला आहे. हे पाकडे सर्जिकल हल्ल्यानंतर बिळात लपले होते. त्यांचा निषेध करावा तितका थोडा आहे. या पाकड्यांचा बदला ॲक्शनला रिॲक्शन मिळेल. याला करारा जवाब मिळेल. कारण हा भारत देश आहे आणि भारताचे पंतप्रधान आणि गृहमंत्री हे पाकड्यांना सोडणार नाही. ज्या निरपराध लोकांचा यात जीव गेलाय त्यांचे बलिदान व्यर्थ जाऊ देणार नाही. पुढे ते म्हणाले, यात महाराष्ट्रातील काही पर्यटकांचा समावेश आहे.

### पुण्यातील पर्यटकांवर गोळीबार

■ पुण्यातील पाच जणांचं कुटुंब पेहेलगामला पर्यटनासाठी गेलं होतं. ज्यामधे दोन पुरुष आणि तीन महिला होत्या. अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाममधे एका व्हॅलीत पर्यटकांसह हे कुटुंब काश्मीरी पोषाख घालून फोटो काढत होतं. त्यावेळी त्यांच्यासमोर अचानक दहशतवादी आले. या पर्यटकांना दहशतवाद्यांनी नावे विचारली. नावांवरुन त्यांचा धर्म लक्षात आला. त्यानंतर पंतप्रधान मोदींबद्दल काही वक्तव्यं करत दहशतवाद्यांनी पर्यटकांवर गोळीबार केला. पाच जणांच्या या कुटुंबातील दोन पुरुषांवर गोळ्या झाडण्यात आल्या. यापैकी एका पुरुषाला तीन गोळ्या लागल्या असून या व्यक्तीची परिस्थिती गंभीर आहे. तर दुसरा पुरुष देखील जखमी आहे. केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले, दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा निषेध करतो. जगदाळे आणि गनबोटे कुटुंबाच्या मी संपर्कात आहे. यासोबतच महाराष्ट्रातील पर्यटकांच्या सुरक्षेच्या आणि मदतीच्या अनुषंगाने आमचे प्रयत्न सुरू आहेत. कौस्तुभ यांच्या मुलीशी माझा संपर्क झाला आहे. त्यांना आवश्यक असलेली वैद्यकीय व अन्य मदत, उपचार दिले जात आहेत.

## केस व नख गळती प्रकरण: केंद्रीय पथकाची बोंडगावात भेट व रुग्णांची तपासणी

भारत संग्राम | प्रतिनिधी



**बुलढाणा :** जिल्ह्यातील बोंडगाव व इतर काही गावांमध्ये वाढत असलेल्या केस व नख गळतीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय पथकाने आज शेगाव तालुक्यातील बोंडगाव येथे भेट दिली. त्यांनी रुग्णांशी संवाद साधत त्यांच्या प्रकृतीविषयी माहिती घेतली आणि आवश्यक नमुने संकलित केले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते उपस्थित होते

या पथकात ICMR, राष्ट्रीय रोग नियंत्रण विभाग, जल जीवन मिशन अंतर्गत पाणी गुणवत्ता विभाग, लेडी हार्डिंग मेडिकल कॉलेजचे त्वचारोग तज्ज्ञ, FSSAI, भारतीय गहू व जव संशोधन केंद्र (हरियाणा), प्लांट क्वारंटाईन विभाग आणि कृषी मंत्रालयाचे तज्ज्ञ यांचा समावेश आहे. बुलडाणा जिल्ह्यातील शेगाव व नांदुरा तालुक्यातील एकूण तेरा गावांमध्ये अशा रुग्णांची संख्या वाढत आहे. केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या निर्देशानुसार हे तज्ज्ञ पथक जिल्ह्यात दाखल झाले असून, गावोगावी जाऊन रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधून आजाराच्या मूळ कारणाचा शोध घेत आहे. ही कारवाई आजाराच्या स्त्रोताचा शोध घेऊन योग्य उपचार व प्रतिबंधात्मक उपाययोजना निश्चित करण्यात महत्त्वाची ठरणार आहे.

## महाराष्ट्र अभिमान पुरस्कार वितरण सोहळा

भारत संग्राम | प्रतिनिधी

➲ गुरुनाथ तिरपणकर



**ठाणे :** समाजाचे आपण काही देण लागतो, त्याप्रमाणे प्रत्येक व्यक्ती आपल्या परिने काम करत असते.काही दानशूर व्यक्ती आपले सर्वस्व समाजसेवेसाठी अर्पित करत असतात, पण समाजासाठी गोर गरीब गरजु गरजवंतांना मदतीचा हात देणारी दानशूर व्यक्ती म्हणजे रामजित (जीतु)गुप्ता सर.महाराष्ट्रातील पिडीत, कष्टाळू समाजातील गरजु गरजवंतांना सहकार्य व मदतीचा हात देणारी व्यक्ती रामजित गुप्ता अशी त्यांची ओळख आहे.समाजात अशा अनेक व्यक्ती आपआपल्या परीने समाजकार्य करत असतात त्यांचा योग्य तो सन्मान व्हावा या अनुषंगाने रामजित गुप्ता सर यांच्या मार्गदर्शनाखाली इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन, निर्मलरत्न चॅरिटेबल ट्रस्ट, दक्ष नागरिक पोलिस मित्र महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने ए.सी.क्लब हाऊस, लोढा आमरा, कोलशेत, ठाणे पश्चिम येथे"महाराष्ट्र अभिमान पुरस्कार"सोहळा आयोजित करण्यात आला होता.याप्रसंगी महाराष्ट्रातील शैक्षणिक, वैद्यकीय, उद्योग क्षेत्र, सांस्कृतिक, सामाजिक, कला, क्रीडा, आरोग्य, साहित्य, पत्रकारिता, शासकीय अधिकारी अशा विविध क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणा-या त्या प्रतिभावंत व्यक्तींना त्यांच्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन त्यांना आकर्षक सन्मानपत्र व सन्माचिन्ह मान्यवरांच्या हस्ते प्रदान करुन त्यांना गौरवांकीत करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर कर्नल रविंद्रजी त्रिपाठी, मिसेस स्टार महाराष्ट्र विजेता प्राची जैन, अभिनेत्री साक्षी नाईक, सिव्हील इंजिनिअर दिगंबर तायडे, मॉटीरेटर ज्योती सनये, वैद्यकीय मदत कक्षाचे न्यायिक सल्लागार धनाजी पवार, सोशल वर्क मध्ये पीएचडी केलेल्या डॉ.अनिता गुप्ता, मुंबईचे सेवानिवृत्त डीसीपी सीताराम न्यायनिर्गुणे, महिला उद्योजक कामिनी भोसले, बिल्डर-उद्योगपती अशोक जैन, दक्ष नागरिक पोलिस मित्र महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष राजेश भोसले, ॲन्टीपायरसी सेल मुंबई चे तपाशी अधिकारी रामजित गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन रुपाली गायकवाड व रघुसिंग राजपूत यांनी सदाबहार, खेळीमेळीच्या वातावरणात उत्कृष्टरित्या केले. याप्रसंगी सर्व उपस्थित मान्यवरांनी कार्यक्रमाच्या आयोजनाची प्रशंसा केली तसेच रामजित गुप्ता यांच्या समाजकार्याचीही मुक्त कंठाने प्रशंसा केली.हा राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा रविवार सोहळा यशस्वी करण्यासाठी सुलक्षणा कांबळे, गायत्री पांडे, राजकुमारी गुप्ता, दीपाली पाटिल, रामजित (जीतु)गुप्ता, सारिका सौदा, स्नेहल ओव्हळ, केतन साळगावकर, मंगेश गुप्ता, महेश गुप्ता, ओम पांडे रहूसिंह राजपूत, रुपाली गायकवाड, केतन म्हात्रे व सहका-यांनी अथक परिश्रम घेतले.शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## केस व नख गळतीच्या आजारावर नियंत्रणासाठी केंद्रीय पथकाला निर्देश; केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव

भारत संग्राम | प्रतिनिधी



**बुलडाणा :** जिल्ह्यातील काही गावांमध्ये केस गळतीचे आणि त्यानंतर नख गळतीचे प्रकार वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी आज केंद्र सरकारच्या पथकाला या आजाराच्या मुळाशी जाऊन कार्य करण्याचे निर्देश दिले.

केस व नख गळतीच्या पश्वभूमीवर मेहकर येथे केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली आढावा घेण्यात आला, त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आय सीएमआर, राष्ट्रीय रोग नियंत्रण विभाग, जल जीवन मिशन अंतर्गत पाणी गुणवत्ता विभाग, लेडी हार्डिंग मेडिकल कॉलेज नवी दिल्लीचे डरमेटोलॉजी तज्ज्ञ, FSSAI, भारतीय गहू व जव संशोधन केंद्र हरियाणा, प्लांट क्वारंटाईन विभाग आणि कृषी मंत्रालयाचे तज्ज्ञ तसेच जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते आदी उपस्थित होते केंद्रीय मंत्री जाधव यांनी घेतलेल्या आढावा बैठकीत रुग्णांना पुन्हा त्रास होऊ नये यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक औषधोपचार सुरू करण्याचे निर्देश दिले. तसेच या आजाराचे मूळ कारण शोधून त्यावर प्रभावी उपाययोजना करा. यासाठी पाणी, रक्ताचे नमुने तसेच बाधित गावातील माती, धान्य आदींचे नमुने संकलित करून प्रयोगशाळेत तपासणी करून अहवाल सादर करण्याचे सुचना दिल्या. बुलडाणा जिल्ह्यातील पहुरजिरा, कालवड, कठोरा, भोनगाव, बोंडगाव, शेगाव आणि नांदुरा तालुक्यातील एकूण तेरा गावांमध्ये रुग्णांची संख्या वाढत आहे. या प्रकरणाची केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या निर्देशानुसार केंद्र आणि राज्य सरकारच्या नऊ विभागांचे तज्ज्ञ आज जिल्ह्यात दाखल झाले आहेत. तज्ज्ञांकडून आता गावागावात जाऊन रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेत प्रत्यक्ष माहिती संकलन केले जाईल. यावरूनच या आजाराचा खरा स्त्रोत आणि त्यावरील उपाय निश्चित केले जातील.

## राज्यात 80 अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

भारत संग्राम | प्रतिनिधी

**मुंबई :** राज्यातील 80 उपजिल्हाधिकाऱ्यांना अप्पर जिल्हाधिकारी या पदावर बढती देऊन त्यांच्या नियुक्तींचे शासन आदेश आज काढण्यात आले. विशेष म्हणजे, तहसीलदारपदाचीही निवडसूची लवकरच होणार आहे. दीड महिन्याआधी महाराष्ट्रात साठ अप्पर जिल्हाधिकाऱ्यांना निवडश्रेणीत देऊन त्यातील 34 अधिकाऱ्यांना जिल्हा जात पडताळणी समितीचे अध्यक्ष करण्यात आले होते, त्या निर्णयामुळे विद्यार्थ्यांना तातडीने जात प्रमाणपत्रे मिळण्यास गती मिळाली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शंभर दिवसांच्या धडक कृती कार्यक्रमातील हा एक महत्त्वाचा निर्णय आहे.


आजच्या पदोन्नती निर्णयामुळे विदर्भ व मराठवाड्यातील अधिकाऱ्यांची अनेक रिक्त पदे भरण्यात आली आहेत. महसूल विभागातील एकाच ठिकाणी अनेक वर्ष राहण्याचा पायंडा या बदली व पदोन्नतीमुळे बदलल्यात आला. दुर्गम भागात अनेक वर्ष राहिलेल्या अधिकाऱ्यांना मुंबई, पुणे या शहरातही बढती व बदली देण्यात आली. अप्पर जिल्हाधिकारी पदांवरील नेमणुकीमुळे आता महसूल विभागातील जिल्हास्तरीय सुनावण्या मोठ्या प्रमाणात होऊन त्यांचा निपटाराही होईल. चंद्रशेखर बावनकुळे हे महसूल मंत्री झाल्यापासून महसूल विभागातील आस्थापनाविषयक अनेक प्रलंबित कामे झपाट्याने मार्गी लागले आहेत. या संपूर्ण बढत्यांमध्ये पारदर्शकता आहे. वर्षानुवर्षे बढत्या होत नसल्यामुळे उपजिल्हाधिकारी वर्गात शिथिलता आली होती.

# माणुसकी जपणारा अधिकारी; आरोग्य विभागात नवचैतन्य!

## डॉ. ठोंबरेंच्या कार्यशैलीने कर्मचारी भारावले, नेतृत्व कसे असावे? आदर्श वस्तुपाठ कामाचा उरक, कर्मचाऱ्यांचा विश्वास

भारत संग्राम | प्रतिनिधी

➲ डॉ. माधव हिवाळे



**वाशिम :** कामाचा केवळ निपटारा न करता, कर्मचाऱ्यांमध्ये आत्मविश्वास आणि आपलेपणाची भावना रुजवणारे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे हे एका वेगळ्याच नेतृत्वाची प्रचिती देत आहेत. त्यांच्या संवेदनशील आणि कृतिशील कार्यशैलीमुळे आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांपासून वरिष्ठांपर्यंत सर्वांच्या मनात त्यांनी एक अढळ स्थान निर्माण केले आहे, जे केवळ प्रशासकीय नाही.

डॉ. पी. एस. ठोंबरे यांच्या व्यक्तिमत्त्वात प्रशासकीय अधिकारी आणि एक संवेदनशील माणूस यांचा अनोखा संगम आढळतो. अनेक अधिकारी केवळ आदेश देऊन काम करवून घेण्याच्या मानसिकतेत असतात, मात्र डॉ. ठोंबरे यांची पद्धत पूर्णपणे भिन्न आहे. ते कर्मचाऱ्यांच्या समस्या आणि अडचणींना केवळ सहानुभूतीने ऐकून घेत नाहीत, तर त्या समस्यांना स्वतःचे मानून त्यावर तात्काळ तोडगा काढण्यासाठी सक्रिय होतात. कोणत्याही कर्मचाऱ्याच्या वैयक्तिक किंवा कौटुंबिक अडचणीत ते स्वतःहून मदतीचा हात पुढे करतात, प्रसंगी स्वतः उपस्थित राहून किंवा योग्य यंत्रणेला तात्काळ सूचना देऊन त्यांनी अनेकांना दिलासा दिला आहे. त्यांच्या या माणूस जोडण्याच्या वृत्तीमुळे आरोग्य विभागासारख्या अत्यंत तणावपूर्ण वातावरणातही एक सकारात्मक आणि विश्वासपूर्ण कार्यसंस्कृती निर्माण झाली आहे. कर्मचारी आता कोणत्याही दबावाखाली काम करत नाहीत, तर एका आश्वासक, प्रेरणादायी आणि आत्मियतेच्या वातावरणात आपले योगदान देत आहेत. 'डॉ. ठोंबरे यांच्यासारखा अधिकारी आमच्या सेवेत पहिल्यांदाच अनुभवत आहोत,' अशा प्रतिक्रिया अनेक कर्मचाऱ्यांनी व्यक्त केल्या आहेत, यावरून त्यांच्या नेतृत्वाची उंची लक्षात येते. त्यांच्या कार्यकाळात आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि जिल्हा रुग्णालयाच्या कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ झाली असून, नागरिकांना मिळणाऱ्या आरोग्य सेवेचा दर्जाही उंचावला आहे. डॉ. ठोंबरे यांनी हे सिद्ध केले आहे की, नेतृत्व म्हणजे केवळ अधिकार गाजवणे नव्हे, तर सहकाऱ्यांच्या सुखदु:खात एकरूप होऊन त्यांना सोबत घेऊन पुढे जाणे.

### अधिकारी नव्हे, कुटुंबातलाच एक सदस्य!

■ डॉ. पी. एस. ठोंबरे हे कर्मचाऱ्यांसाठी केवळ वरिष्ठ अधिकारी नाहीत, तर कुटुंबातील एका सदस्याप्रमाणे आहेत. प्रत्येक कर्मचाऱ्याचे दुःख ते आपले वैयक्तिक दुःख मानतात. त्यांच्या अडचणी समजून घेण्यासाठी आणि त्या सोडवण्यासाठी ते नेहमीच तत्पर असतात. अनेकदा त्यांनी कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक किंवा कौटुंबिक समस्यांमध्ये स्वतः लक्ष घालून, केवळ सहानुभूती न दाखवता कृतिशील मदतीतून आधार दिला आहे. ही आपुलकीच त्यांना इतरांपेक्षा वेगळे ठरवते.

### कामात जोश, सेवेत सुधारणा; नेतृत्वाचा प्रभाव!

■ डॉ. ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य विभागात कामाचा दबाव नाही, तर कामाचा जोश वाढला आहे. त्यांनी निर्माण केलेल्या सकारात्मक आणि प्रेरणादायी वातावरणामुळे कर्मचारी अधिक आत्मियतेने आणि जबाबदारीने काम करत आहेत. 'असा अधिकारी प्रथमच पाहिला,' ही कर्मचाऱ्यांची प्रतिक्रियाच सर्व काही सांगून जाते. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे आरोग्य केंद्रांपासून जिल्हा रुग्णालयापर्यंत सर्वत्र कार्यक्षमतेत आणि सेवेच्या गुणवत्तेत सुधारणा झाली आहे.

## अग्रलेख

# 'वक्फ'की कैद में...

काही राजकारणी आणि पक्ष जराही अपेक्षाभंग करत नाहीत. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, त्यांचा तृणमूल आणि तेथील विरोधी पक्ष भाजप हे या अशांतील एक. वक्फ सुधारणा कायदा मंजूर झाल्यानंतर त्यांच्या आधिपत्याखालील पश्चिम बंगालात त्याची हिंसक प्रतिक्रिया उमटेल आणि भाजप त्यावर रान उठवेल असा अंदाज व्यक्त केला जात होता. तो ममताबाई आणि भाजप यांनी पूर्ण खरा ठरवला. या वक्फ कायद्यास काँग्रेसप्रमाणे ममता बॅनर्जी यांचा विरोध आहे. लोकशाहीत बहुमताचे चालते हे सत्य लक्षात घेतल्यास संसदेत सत्ताधारी पक्षाकडे बहुमत आहे; त्यांनी त्याआधारे वक्फ विधेयक मंजूर करून घेतले हे सत्य ममताबाईंनी मान्य करायला हवे. त्यास त्या तयार नाहीत. आपल्याकडे प्रत्येक पक्ष आपापल्या 'मतदारांस' खूश करण्याचा प्रयत्न करतो. तथापि सतत मतदारांच्या खुशीचे राजकारण करण्याची सवय लागली की खूश करणे आणि लोकानुनय यांतील सूक्ष्म सीमारेषा दिसेनाशी होते. बराच काळ सत्ता उपभोगलेला काँग्रेस ही सीमारेषा विसरला आणि २०१४ साली सत्ता भाजपच्या हाती सोपवता झाला. आता तुष्टीकरणाची भाजपची पाळी. इतके दिवस काँग्रेस आणि डावीकडील पक्षांनी मतांसाठी अल्पसंख्याकांचे तुष्टीकरण केले. त्या तुष्टीकरणाचा लंबक आता अल्पसंख्याकांकडून बहुसंख्याकवादाकडे झेपावणार हे ओघाने आलेच. वक्फ विधेयक मंजुरी हा त्याचाच एक भाग. 'आधीच्या राजवटींनी इस्लाम धर्मीयांस 'वक्फ'च्या नावाखाली अनावश्यक जमिनी बहाल केल्या; सबब हे लांगूलचालन आता थांबवायला हवे,' ही भाजपने वक्फ विधेयकासाठी बहुसंख्याकांच्या मनी उतरवलेली कथा. ती बहुसंख्याकांस विश्वासार्ह का वाटते याचा विचार न करता ममतांच्या तृणमूल आणि अन्य पक्षीयांनी त्याविरोधात रान उठवले. वास्तविक मंगळवारी, १६ एप्रिल रोजी, या विधेयकावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी आहे. तोपर्यंत सर्वांनीच धीर धरण्यास हरकत नव्हती. तथापि आपणच खरे अल्पसंख्याकांचे हितरक्षक हे सिद्ध करण्याची तृणमूल घाई आणि त्यांस बहुसंख्याकविरोधी ठरवण्यास हातघाईवर आलेला भाजप यांतून मुर्शिदाबाद परिसरात दंगल सुरू झाली. त्यात तीन जणांचे प्राण आणि अनेकांच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यानंतर ही दंगल काही प्रमाणात तिसऱ्या दिवशी जरा शमलेली दिसते. पण ही शांतता हंगामी ठरण्याचीच शक्यता अधिक. कारण अवघ्या वर्षभरात पश्चिम बंगालमध्ये निवडणुका आहेत आणि ममता बॅनर्जी यांना हटवण्यासाठी एक नव्हे तर तीन तीन पक्ष उत्सुक आहेत. यात सगळ्यात आघाडीवर अर्थातच भाजप. गेल्या निवडणुकीतच आपण सत्ताधीश होऊ अशी अपेक्षा त्या पक्षास होती. परंतु खमक्या ममताबाईंनी ती हाणून पाडली. तेव्हा भाजपची अस्वस्थता समजून घ्यायला हवी. भाजपने काय नाही केले? दुर्गादेवींच्या प्रदेशात मारुतरायास मैदानात उतरवले, पक्ष फोडला, न फुटणाऱ्यांस तुरुंगात डांबले, न्यायाधीशांस निवडणुकीत उतरवले असे बरेच काही करूनही भाजपच्या हाती आपली निराशाच! ममताबाईंचे नाक वरच. ते भाजपला सहन होणे अवघड हे दिसत होते. परत केवळ भाजपच नव्हे तर एकेकाळचे सत्ताधीश डावे आणि सत्तासुख हरवून कित्येक दशके झालेला काँग्रेस हेही ममतांच्या पायउतारास उत्सुक. पण ममताबाई आणि त्यांचा तृणमूल काही त्यांना आनंद देईनात. तेव्हा मिळेल त्या मार्गाने आणि मिळेल त्या कारणाने त्या राज्यात अस्वस्थता कशी नांदेल असे प्रयत्न होणार हे उघड होते. अशावेळी खरे तर ममताबाईंनी अधिक जागरूक राहणे गरजेचे होते. आंदोलन, हिंसाचार होणार नाही यासाठी त्यांनी डोळ्यात तेल घालून प्रशासन हाताळण्याची गरज होती. पण तो विवेक ममताबाईंनी दाखवला नाही. आपणास नाक खाजवून दाखवणाऱ्या विरोधकांकडे दुर्लक्ष करण्याइतका मुत्सद्दीपणा त्यांच्या ठायी नाही याचे अनेक दाखले अलीकडच्या इतिहासात आढळतात. चिडवले म्हणून चिडणे नैसर्गिक. पण आपण चिडावे म्हणून चिडवणाऱ्या विरोधकांकडे दुर्लक्ष करून आपणास सोयीचे तेव्हाच रागावणे यास शहाणपण लागते. ते त्यांच्या ठायी असल्याचा पुरावा नाही. निदान मुर्शिदाबाद दंगलीतून तरी तो सिद्ध होत नाही. वक्फ विधेयकास विरोध असणे गैर नाही. पण त्या विरोधासाठी जमलेल्या जमावास हिंसाचारापासून रोखता न येणे हे मात्र खचितच गैर. असे गैरकृत्य पश्चिम बंगाल सरकारच्या नाकर्तेपणातून घडले हे अमान्य करता येणार नाही. आता या संदर्भात परस्पर विरोधी दावे केले जातील. भाजपचे नेते मुसलमानांनी सुरुवात केली आणि हिंदूंवर हल्ले केले असे म्हणतील तर तृणमूल नेत्यांस या हिंसाचारात मुसलमान बळी पडल्याचे सांगत त्यांचा पत्कर घ्यावा लागेल. तसे झाले तर पुन्हा एकदा तृणमूल हा विरोधी भाजपच्या जाळ्यात अडकणार. ममता बॅनर्जी यांना फक्त अल्पसंख्याकांचाच कळवळा आहे आणि त्यासाठी प्रसंगी सामान्य हिंदूंस वाऱ्यावर सोडण्यास त्या मागेपुढे पाहणार नाहीत, असा प्रचार भाजप करणार. काँग्रेस असो वा तृणमूल वा अन्य विरोधी पक्ष. त्यांस या पद्धतीने अडचणीत आणण्याचा सुलभ आणि खात्रीशीर मार्ग भाजपला गवसलेला आहे. या पक्षांवर अल्पसंख्याकांच्या तुष्टीकरणाचा आरोप केला की झाले. तो नाकारला तर अल्पसंख्य नाराज होतात आणि तो सिद्ध झाला तर बहुसंख्य दुरावतात अशी 'इकडे आड तिकडे विहीर'सारखी परिस्थिती. तीस सामोरे जात हे भाजप आव्हान पेलायचे तर ममताबाई आणि विरोधकांस किमान दोन बदल करावे लागतील. पहिला मुद्दा खास ममताबाईंसाठी. तो म्हणजे भ्रष्टाचारमुक्त प्रशासन देण्याची शिकस्त करणे. भाजपची पराचा कावळा करण्याची अतुलनीय क्षमता लक्षात घेऊन अशी संधी त्या पक्षास मिळणार नाही याची पुरेपूर खबरदारी घेणे. हे सत्य जितके ममताबाईंना तितकेच कर्नाटकातील काँग्रेसच्या सिद्धरामय्या यांनाही लागू होते. तूर्त ममताबाईंना ते प्रत्यक्षात आणावे लागेल. दुसरा मुद्दा हिंदू-मुसलमान वादांत न अडकणे. कोणत्याही समाजात कोणा एका धर्मीयांचे शंभर टक्के कधी बरोबर नसते आणि कोणी एक शंभर टक्के चुकीचा नसतो. प्रत्येक मुसलमान हा देशविरोधी असे दाखवण्याचा भाजपचा प्रयत्न जितका चुकीचा तितकाच मुसलमानांची प्रत्येक बाब गोड मानून तीकडे काणाडोळा करण्याचा तृणमूल, काँग्रेस आदी पक्षांचा पवित्रा गैर. सध्या वादाची ठिणगी ज्यावरून पडली त्या वक्फ विधेयकावरील भूमिकांतूनही हा आपपरभाव दिसून येतो. इतिहासात वक्फचे वर्तन शंभर टक्के रास्त आणि अभ्रष्ट होते असे मुसलमानांतील शहाणेही म्हणणार नाहीत. तेव्हा तसे विरोधी पक्षांनी म्हणण्याचे कारण नाही. याचा अर्थ सत्ताधारी भाजपने आणलेले वक्फ विधेयक उत्तम आहे, असा अजिबात नाही. या विधेयकातील त्रुटींवर ''वक्फ'ने किया...' (४ एप्रिल ) या 'लोकसत्ता' संपादकीयात भाष्य होते. तेच मुद्दे आता सर्वोच्च न्यायालयात धसास लागतील. तेव्हा विरोधी पक्षीयांनी इतका आततायीपणा करण्याचे काहीच कारण नाही. तसे करून आपण सत्ताधारी भाजपच्या सापळ्यात अडकतो आहोत हे या सर्वांस कळत नाही, हे आश्चर्य. वक्फचा मुद्दा किती ताणायचा याचे भान विरोधकांनी दाखवायला हवे. सत्ताधारी भाजपस तेच तर हवे आहे. तथापि आपल्या विरोधकास जे हवे ते मिळू न देणे हे राजकारण. ते करण्याची बौद्धिक धमक विरोधकांनी दाखवावी आणि (फरीदा खानम आणि शायर फय्याज़ हाशमी यांची क्षमा मागून) 'वक्फ की कैद में जिंदगी है मगर...' ही अवस्था टाळावी. दंगली

# 'मूल'भूत मुत्सद्देगिरी!



सहकुटुंब सहपरिवार भारत भेटीवर असलेले अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातील चर्चेत उभय देशांतील आर्थिक संबंधांत लक्षणीय प्रगती झाल्याचे दोन्ही बाजूंनी सांगण्यात आले. पंतप्रधानांशी या दौऱ्यात व्हान्स हे सपत्नीक, सपुत्रपुत्री चर्चा करते झाले. एक कु. व्हान्स पंतप्रधानांस मोरपीस देताना, दुसरा कु. व्हान्स पंतप्रधानांसमोरील बैठकीवर पहुडलेला अशी छायाचित्रे आज प्रसिद्ध झाली. ती पाहून चर्चा चांगलीच खेळीमेळीच्या वातावरणात झाली असे मानण्यास हरकत नाही. अमेरिकेच्या अध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा आल्यापासून आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीस सर्वार्थाने नवे परिमाण लाभल्याचे दिसून येते. व्हाइट हाऊसमध्ये अध्यक्ष ट्रम्प यांचे निकटवर्तीय उद्योगपती इलॉन मस्क यांचे सुपुत्र-सुकन्या पाहुण्यांसमोर बागडत आहेत, त्यांच्या डझनाहून अधिक अपत्यांपैकी एखादे त्यांच्या प्रत्यक्ष डोक्यावर बसले आहे, दुसऱ्या कोणास साक्षात अमेरिकी अध्यक्ष जोजावत आहेत आणि अन्य एखाद्यास शाही पाहुणा खेळवतो आहे असे चित्र अलीकडे वारंवार दिसू लागले आहे. आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरी कौटुंबिक पातळीवर आणून ठेवण्याचा ट्रम्प यांचा हा प्रयत्न राजकारणात कुटुंबसंस्थेचे महत्त्व अधोरेखित करतो. ट्रम्प यांचा या क्षेत्रातील अनुभव चांगलाच व्यापक आणि मस्क हे तर किमान चार ज्ञात कुटुंबांचे पालनकर्ते. ट्रम्प-मस्क यांचे हे आपल्या पाल्यांस मुत्सद्देगिरीचे बाळकडू बालपणापासून पाजण्याचे अनुकरण व्हान्स करताना दिसतात. असो. यामुळेही असेल पण पंतप्रधान-उपाध्यक्ष भेटीबाबत कोणतेही अधिकृत संयुक्त निवेदन प्रसृत केले गेले नाही. तथापि ही चर्चा अत्यंत फलदायी झाल्याचे उभय बाजूंनी सांगितले गेले. आता या 'फला'चा अर्थ लावणे गरजेचे. तो खुद्द व्हान्स यांनी जयपूर येथील भाषणातून उघड करून सांगितला. भारताने अमेरिकेकडून अधिकाधिक शस्त्रसामग्री घ्यावी, अमेरिकी उत्पादनांस जास्तीत जास्त बाजारपेठ मिळावी, अमेरिकी धान्यापासून तयार झालेले इथेनॉल भारताने अधिकाधिक खरेदी करावे, भारतीय वाहनांत अमेरिकी इथेनॉल वापरण्यास सुरुवात करावी, भारताच्या संरक्षणात आमची 'एफ-३५' ही विमाने निर्णायक भूमिका बजावतील सबब भारताने ती आणखी घ्यावीत, अणुऊर्जा क्षेत्रातील अमेरिकी कंपन्यांना भारतात अधिक सुलभ प्रवेश मिळावा, भारतीय ऊर्जा सुरक्षिततेसाठी अमेरिकी इंधन उत्पादने भारताने मोठ्या प्रमाणावर वापरावीत हा व्हान्स यांच्या दौऱ्यामागील अर्थोद्देश. आगामी शतक हे भारत आणि अमेरिका यांचे असणार आहे आणि उभय देशांनी 'समान तत्त्वा'वर व्यापारउदीम वाढवावा असे त्यांचे म्हणणे. व्हान्स भारताच्या भेटीवर असताना आपल्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन याच उद्देशाने अमेरिका दौऱ्यावर आहेत. त्याआधी वाणिज्यमंत्री पीयूष गोयल यांनीही अमेरिकावाऱ्या केल्या. हेतू हा की उभय देशांतील व्यापार करार लवकरात लवकर व्हावा. उपाध्यक्ष व्हान्स यांची भारत भेट त्याच अनुषंगाने होती. या भेटीत व्यापार कराराविषयी चांगली प्रगती झाली असे व्हान्स सांगत असताना त्याचवेळी अमेरिकेत असलेल्या अर्थमंत्री सीतारामन यांच्या मते उभय देशांतील पहिला करार प्रत्यक्षात येण्यास ऑक्टोबर उजाडेल. व्हान्स यांच्या भारत दौऱ्यात या विषयावर प्रगती झाल्यामुळे त्यास जेमतेम चार-पाच महिन्यांचा अवधी लागेल, असे दिसते. म्हणजे हा सहकुटुंब दौरा झाला नसता आणि अपेक्षित प्रगती झाली नसती तर करारास आणखी विलंब लागला असता असे म्हणता येईल. या पार्श्वभूमीवर उभय देशांत असा करार होणार म्हणजे नक्की काय होणार यावर भाष्य आवश्यक. कारण ट्रम्प यांच्या मते भारत अमेरिकेस जितक्या मूल्याची उत्पादने विकतो तितक्या प्रमाणात अमेरिकी वस्तूंची खरेदी करत नाही. म्हणजे त्यामुळे भारत-अमेरिका हा व्यापार आपल्यासाठी फायद्याचा आणि अमेरिकेसाठी आतबट्ट्याचा आहे, असे ट्रम्प म्हणतात. सबब भारताने अमेरिकेकडून अधिकाधिक उत्पादने खरेदी करून हे व्यापार असंतुलन दूर करावे असा अमेरिकेचा आग्रह आहे. ट्रम्प यांनी भारतीय उत्पादनांवर अलीकडेच २६ टक्के आयातशुल्क लावले ते याच उद्देशाने. त्यास त्यांनी तूर्त ९० दिवसांची स्थगिती दिलेली आहे. या स्थगन काळात उभय देशांतील व्यापार करार नव्याने लिहिले जाणे अपेक्षित. म्हणजे या काळात अमेरिकी उत्पादनांचा भारत ओघ वाढणे गरजेचे. तो किती वाढायला हवा? नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात उभय देशांतील ही व्यापारतूट ४१०० कोटी डॉलर्स इतकी आहे. गेल्या वर्षी ती ३५३३ कोटी डॉलर्स होती आणि त्याआधी २७६८ कोटी डॉलर्स. याचा अर्थ ट्रम्प म्हणतात त्याप्रमाणे भारतीय उत्पादने अमेरिकेत अधिक विकली जातात आणि अमेरिकी उत्पादनांना भारतीय बाजारपेठेत मात्र तितका वाव नाही. तो आता अधिक कसा मिळेल यासाठी ट्रम्प प्रशासन प्रयत्नशील आहे. अमेरिकेची कृषी आणि दुग्धजन्य उत्पादने भारतीय बाजारपेठेत मुक्तपणाने विकू दिली जावीत, हा त्यातील एक आग्रह. तो आपणास मान्य नाही. कारण तसे झाल्यास स्वस्त अमेरिकी उत्पादनांनी भारतीय बाजारपेठा वाहू लागतील आणि त्याचा फटका स्थानिक, भारतीय उत्पादनांस बसेल. तसे होणे आत्मनिर्भरतेच्या आड येणारे ठरेल. पण भारताप्रमाणे अमेरिकाही आत्मनिर्भर होऊ पाहात असून त्यामुळे इतरांनी अधिकाधिक अमेरिकी उत्पादने खरेदी करावीत असा त्या देशाचा आग्रह आहे. व्हान्स यांच्या या भारत भेटीतही तो प्रकर्षाने दिसतो. विशेषत: जयपूर येथील भाषणात त्यांनी भारताने काय काय अमेरिकेकडून घ्यावे याची जी यादी सादर केली ती पुरेशी स्पष्ट आहे. वास्तविक एके काळी इलॉन मस्क यांनी ज्यांचे वर्णन 'भंगार' असे केले होते ती 'एफ ३५' विमाने भारताने घेण्याची भलामण व्हान्स येथे करत होते. पण आपली ही खरेदी यात्रा तेवढ्यावर संपण्याची चिन्हे नाहीत. 'द फायनान्शियल टाइम्स' या अत्यंत विश्वसनीय दैनिकाने व्हान्स भारतात असतानाच मंगळवारी एक महत्त्वाचा वृत्तांत प्रसिद्ध केला असून त्यानुसार ॲमेझॉन आणि वॉलमार्ट यांच्या भव्य दुकानांस भारताची बाजारपेठ खुली करून दिली जावी असा आग्रह अमेरिकेने धरला असल्याचे त्यात म्हटले आहे. ॲमेझॉन ऑनलाइन सेवेत आजही भारतात आहे. तथापि त्यातही त्यांस बऱ्याच अटींचा सामना करावा लागतो आणि त्याचवेळी त्याच्या भारतीय स्पर्धकांस मात्र अनेक सवलती दिल्या जातात. सबब ही समान स्पर्धा नाही, असे अमेरिकी कंपनीचे म्हणणे. त्याचवेळी किराणा क्षेत्रात परकीय भांडवलावर मर्यादा असल्याने वॉलमार्ट कंपनीस भारतात प्रत्यक्ष दुकाने सुरू करणे जमलेले नाही. 'फायनान्शियल टाइम्स'च्या वृत्तानुसार अमेरिका या दोन मुद्द्यांचा आग्रह भारताकडे धरत असून या वृत्तात तथ्य नाही असे म्हणता येणे अवघड. त्याचवेळी अधिकाधिक भारतीय कंपन्यांनीही अधिकाधिक अमेरिकी उत्पादने आयात करावीत असाही भारताचा प्रयत्न असल्याचे अर्थविषयक नियतकालिकांतील वृत्तावरून दिसते. ही आयात वाढावी यासाठी काही अनुदान वा तत्सम काही विशेष मदत आपल्या आयातदारांस देता येईल किंवा काय याची चाचपणी सरकारकडून सुरू असल्याचे या वृत्तांवरून समजते. भारत-अमेरिका व्यापार तूट कमी करायची तर हे आणि असे अन्यही उपाय योजणे अनिवार्य. कारण इतक्या वर्षांची तूट एकाच झटक्यात एकाच निर्णयाने भरून येणे अशक्य. या संदर्भात भारताची भूमिका सकारात्मक असल्याचे अमेरिका म्हणते आणि व्हान्स यासाठी भारताचे अभिनंदन करतात. याचा अर्थ उघड आहे. तो कधी समोर येतो ते पाहायचे. तूर्त या मुलाबाळांसमवेत मुत्सद्देगिरीच्या 'मूल'भूत नव्या शैलीशी जुळवून घेण्याखेरीज अनेकांस पर्याय नाही, हे निश्चित.

## सावत्र लेकीवर बलात्कार आणि बायकोचा खून

भारत संग्राम | प्रतिनिधी

**मुंबई :** तब्बल 21 वर्षांपासून फरार असलेला खून आणि बलात्काराच्या गुन्ह्यातील आरोपीला अखेर अटक करण्यात आली आहे. ही कामगिरी केली आहे मीरा भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयातील गुन्हे शाखा दोनच्या युनिटने. साजिद उर्फ परवेज शेख (55) असे या आरोपीचे नाव आहे. 2004 साली याने आपल्या सावत्र मुलीवर बलात्कार केला आणि त्यानंतर तिच्या आईला देखील ठार मारले होते. तेव्हापासून आरोपी नाव बदलून 21 वर्ष वावरत होता.

आरोपीच्या विरोधात 20 मे 2004 रोजी गुन्हा नोंदवण्यात आला होता. फिर्यादी महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, तिच्या सावत्र पित्याने तिच्याशी जबरदस्ती शारीरिक संबंध ठेवले होते, ज्यातून ती गरोदर राहिली होती. या घटनेची माहिती तिने तिच्या आईला दिली होती. आईने आरोपीला जाब विचारला, याचा आरोपीला राग आला. रागाच्या भरात आरोपी साजिद आली शेखने तिला बेदम मारहाण करत जमिनीवर आपटून खून केला. या घटनेनंतर आरोपी फरार झाला होता. आरोपी साजिद अली शेख याने स्वतःची ओळख लपवली होती. 21 वर्ष तो परवेज आशिक अली या नावाने धारावीमध्ये राहत होता. पोलिसांनी याला शोधण्याचा खूप प्रयत्न केला होता. अखेर 21 वर्षांनी पोलिसांनी या आरोपीच्या मुसक्या आवळ्या आहेत. गुन्हे शाखा दोनच्या युनिटने तांत्रिक माहिती आणि गोपनीय माहितीच्या आधारे साजिदचा ठावठिकाणा शोधून काढला व सापळा रचून त्याला अटक केली. धारावी येथील जामा मस्जिदजवळ असलेल्या चामडा बाजार येथे तो राहत असल्याचे गोपनीय माहितीच्या आधारे निष्पन्न झाले.

## प्रदिप पाटील मोरे यांची युवासेना जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती !

भारत संग्राम | प्रतिनिधी
➲ प्रदीप सावले

**वाशिम :** रिसोड तालुक्यातील कळमगव्हाण येथील माजी सरपंच तसेच युवा सेना उपजिल्हाप्रमुख म्हणून कार्यरत असलेले प्रदीप पाटील मोरे यांची युवासेना वाशिम जिल्हाप्रमुख (रिसोड,मालेगाव व मंगरुळपीर) पदी नियुक्ती करण्यात आली आहे ही नियुक्ती २१ एप्रिल २०२५ रोजी विधान परिषद आमदार,तथा माजी खासदार विदर्भ कन्या भावनाताई गवळी यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन करण्यात आली हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण पुढे नेत, शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या आदेशानुसार मोरे यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.



प्रदीप पाटील मोरे हे शिवसेनेशी गेल्या अनेक वर्षांपासून निष्ठेने जोडलेले असून,त्यांनी शेतकरी,विद्यार्थी,कष्टकरी व वंचित घटकांच्या प्रश्नांवर अनेक आंदोलने उभारून शासन दरबारी प्रभावी आवाज उठवला आहे. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी जनतेचा विश्वास संपादन केला असून,आज त्यांच्यावर जिल्हाभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. विशेषतः त्यांनी माजी खासदार भावनाताई गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक सामाजिक आणि राजकीय उपक्रमात सक्रिय सहभाग घेतला आहे त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक वंचित,दुर्लक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यात त्यांनी यश मिळवले आहे या नियुक्तीमुळे केनवड जिल्हा परिषद सर्कलसह रिसोड,मालेगाव आणि मंगरुळपीर तालुक्यांमध्ये युवासेनेला नवीन उभारी मिळेल,असा विश्वास राजकीय जाणकारांनी व्यक्त केला आहे प्रदीप मोरे यांनी सामाजिक समरसतेचा संदेश घेऊन सर्व समाज घटकांमध्ये समन्वय साधत शिवसेनेची ध्वजपताका बुलंद करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे युवकांमध्ये नेतृत्वगुण,संघटन कौशल्य आणि समाजसेवेची भावना रुजवण्यासाठी ते विशेष प्रयत्नशील राहणार आहेत या नवीन जबाबदारीतून ते जिल्ह्यातील युवकांचे प्रश्न सोडवण्यासाठी,रोजगार संधी,शिक्षण सुविधा,आणि सामाजिक न्याय यासाठी ठोस पावले उचलतील,अशी अपेक्षा व्यक्त होत आहे प्रदीप मोरे यांच्या या निवडीमुळे वाशिम जिल्ह्यात युवासेनेच्या कार्याला नवसंजीवनी मिळेल,तसेच आगामी काळात शिवसेना पक्ष संघटन अधिक भक्कम होईल,असा विश्वास पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाला आहे पक्षातील वरिष्ठ नेत्यांनी टाकलेला विश्वास सार्थ ठरवीत पक्षाचे विचार तळागाळापर्यंत पोचवून पक्ष संघटन वाढीसाठी प्रयत्न करणार असल्याचे यावेळी प्रदीप मोरे यांनी सांगीतले.

## मुंदडा विद्यालयाचे माजी विद्यार्थी आले ३० वर्षांनी एकत्र

भारत संग्राम | प्रतिनिधी
➲ प्रदीप सावले

**मालेगाव :** येथील ना.ना.मुंदडा विद्यालयाची १९९४ ची वर्ग १० वी ची बॅच ३० वर्षानंतर एकत्र आली आणी जुन्या आठवणी ,प्रसंग,आनंद व दुःखाचे क्षण आठवुन त्यांना उजाळा देण्याचे काम या माजी विद्यार्थ्यांच्या मनामिलन कार्यक्रमामधे बघायला मिळाले २० एप्रील रोजी मुंदडा विद्यालयाच्या या माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्याच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे सचिव आशिष मुंदडा हे होते . या वेळी तत्कालीन शिक्षक रतन अघमकर,अरविंद देशमुख,डी बी जोशी,प्राचार्य दिनेश उंटवाल,उपप्राचार्य संध्या उंबरकर,यांची उपस्थिती होती आदर्श विद्यार्थी हीच शिक्षकांची खरी



संपत्ती असते व ती सर्व दिशेने पसरली असल्याने खरा आनंद मिळतो असे अरविंद देशमुख म्हणाले आमच्या शाळेचे विद्यार्थी आज विविध क्षेत्रात काम करत असुन शिक्षकांचे व शाळेचे नाव उंचावत असल्याचे अघमकर यांनी सांगीतले यावेळी प्राचार्य उंटवाल यांनी उच्च पदावर गेलेल्या माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या प्रति आपले ऋण म्हणुन शाळेसाठी काही योगदान देण्याचे आवाहन केले संचालन मदन शर्मा व लक्ष्मण चापे यांनी तर प्रास्ताविक डॉ सतीष घुगे यांनी केले आभार प्रदर्शन स्मिता कांबळे व धीरज शर्मा यांनी केले यावेळी विनोद झळके,मोहन शर्मा,लक्ष्मण चापे,विनोद बळी,महेश भुतडा,महेश मंत्री,विनोद घुगे,संतोष गट्टाणी,ॲड संतोष चव्हाण,अरुण आंधळे,विजय भुतकर,रामदास पहारे,रवी घुगे,राजेश बोरचाटे,पंजाब घुगे,संजय देवळे,मुरलीधर देवळे,महादेव ठाकरे,धिरज पांडे,अविनाश काटेकर,राजेश देवळे,सतीश काटेकर,मनोज काळबांडे,आकाश गोरे,संदीप सावळे,सुनील ठाकरे,सुनील जोशी,भागवत घुगे,मनोज नाकाडे,धीरज शर्मा,संतोष सोभागे,डॉ सतीश घुगे,मदन शर्मा,अरुण बाजड, कान्हू देवळे, संजय राजूरकर,अनिल बाविस्कर,शशिकांत तनमने,रामदास इवरकर,विठ्ठल बोरचाटे,रामदास वैद्य,संतोष साठे,अमोल लादेअनमोल ढोरे,प्रफुल्ल पागनीस,रवी भोयर,सिद्धार्थ कान्हेड,आदी विद्यार्थ्यांसोबतच अनेक विद्यार्थीनी हजर होत्या त्यामधे पुष्पलता अफुने,आरती,मानधने,नितु मालवीया,संगीता बियाणी,विनयभाला ज्योती जाजु,सरला राजुरकर,कल्पना काळबांडे,हेमा शर्मा,सिमा मिश्रा,सुनिता अनसिंगकर,रिता माने,पोर्णीमा चौधरी,सुधा नागरे सुरेखा चांगाडे,शबाना खान,नलीनी कालपांडे,स्मिता कांबळे आदी उपस्थित होत्या यावेळी महाराष्ट्र व राज्याबाहेरून सुद्धा आले होते ' या सर्वांनी दिवसभर विविध कार्यक्रम सादर करून निरोप घेतला .

भारत संग्राम (मराठी दैनिक) ● RNI No. MAHMAR/2020/79677
मुद्रक - महादा आश्रु हिवाळे प्रकाशक - महादा आश्रु हिवाळे मालक - महादा आश्रु हिवाळे मुद्रण स्थळ - आधार प्रिंटर्स महामाया निवास, गौरीशंकर स्कुल के सामने, नालंदानगर, वाशिम ता.जि. वाशिम ४४४५०५ (महाराष्ट्र) प्रकाशन स्थळ - कार्यालय दैनिक " भारत संग्राम ", महामाया निवास, गौरीशंकर स्कुल के सामने, नालंदानगर, वाशिम ता.जि. वाशीम ४४४५०५ (महाराष्ट्र) संपादक - महादा आश्रु हिवाळे (सर्व वाद वाशिम न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

## थोडक्यात



### मंडळाचे विनंतीवरून स्वातंत्र्य लढा स्मरण पदयात्रा लीलाताई स्मारकाच्या लोकार्पणानंतर होणार - गीतांजली घोरपडे

भारत संग्राम | प्रतिनिधी

**अमळनेर :** आज दिनांक 22 एप्रिल रोजी डांगरी ग्रामस्थ प्रतिनिधी मंडळ व स्वातंत्र्यलढा स्मरण पदयात्रेचे आयोजक या दोघांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते यांप्रसंगी सर्वप्रथम डांगरी गावचे मा.सरपंच मा. अनिल शिवदास सिसोदे यांनी गावकऱ्यांच्या भावना या तुमच्या सोबत आहेत तुमचे स्वागत करणे आमचे कर्तव्य आहे मात्र स्मारकाच्या लोकार्पणावरून होणारी तू, तू ,मै ,मै पाहता आपण आमच्या विनंतीला मान द्यावा व अमळनेर नगरपालिकेच्या लीलाताई उत्तमराव पाटील स्मारकाच्या लोकार्पणानंतर आम्ही तुम्हाला आमंत्रित करू त्यावेळेस सारे मिळून लीलाताईंच्या कार्यकर्तृत्वासाठी पदयात्रेचेजोरदार पणे स्वागत आम्ही करू म्हणून आम्ही गावकऱ्यांच्या वतीने आपणासमोर आलेलो आहोत यात्रा तूर्त स्थगित करावी यांप्रसंगी डॉ.उत्तमराव पाटील यांचे पुतणे प्रशांत शांताराम शिसोदे हे देखील उपस्थित होते तसेच शिसोदे सर यांनी देखील आपले म्हणणे मांडताना सांगितले की आयोजकांचा हेतू अतिशय शुद्ध आहे ते देखील समाजवादी पुरोगामी विचाराचे आहेत आमच्याच लीलाताई आणि डॉ.उत्तमरावांच्या कार्यकर्तुत्वाचा प्रसार, प्रचार करीत आहेत त्यामुळे त्यांना विरोध करणे योग्य होणार नाही. मात्र त्यांनी सगळ्यांना सोबत घेऊन ही पदयात्रा आयोजित करावी अशी आम्ही विनंती करतो.त्यानंतर स्वातंत्र्यलढा स्मरणपद यात्रेच्या आयोजन समितीतील संदीप घोरपडे यांनी सांगितले की आम्ही डांगरी ग्रामस्थ व पत्रकार बांधवांचे लीलाताईंच्या नावाने बांधलेल्या इमारतीत तसेच प्रति सरकारच्या स्वातंत्र्यसैनिकांच्या चिमठाणा खजिना लुटीतील सेनानींच्या स्मारकांमध्ये स्वागत करतो तसेच आपल्या गावकऱ्यांच्या भावनेचा आदर करून आम्ही याचा सकारात्मक विचार करूत्यानंतर स्वातंत्र्यलढास्मरण पद यात्रेच्या प्रमुख नेत्या गीतांजली संदीप घोरपडे यांनी सांगितले.



### दर्ग्याच्या पाहणीपूर्वीच हुसैन दलवाईंना पोलिसांनी घेतले ताब्यात

भारत संग्राम | प्रतिनिधी

**नाशिक :** नाशिक येथील काठे गल्लीतील अनधिकृत सातपीर दर्ग्याच्या पाडकामावेळी पोलिसांवर तूफान दगडफेक झाली होती. यात अनेक पोलिस जखमी झाले होते. त्यानंतर येथे तणावपूर्ण शांततेत अतिक्रमण कारवाई करण्यात आली. आज मंगळवारी कॉंग्रेसचे माजी खासदार हुसैन दलवाई नाशिकमध्ये दाखल झाले. दर्ग्यावर केलेल्या अतिक्रमण कारवाईची पाहणी करण्यासाठी ते जात असतानाच त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. नाशिक पोलिसांनी हुसैन दलवाई यांना ताब्यात घेतले आहे. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मोठा पोलिस बंदोबस्त देखील तैनात करण्यात आला होता. हुसैन दलवाई यांना गंगापूर पोलिस ठाण्यात नेण्यात आले आहे. यावेळी प्रसार माध्यमांना प्रतिक्रिया देताना दलवाई यांनी जोरदार हल्लाबोल केला आहे. मी दंगा करणारा माणूस नाही, जे दंगे करतात त्यांना तुम्ही संरक्षण देतात, असे दलवाई म्हणाले आहेत. पोलिसांनी ताब्यात घेतल्यावर हुसैन दलवाई म्हणाले, पोलिसांचे म्हणणे आहे की, तुम्ही गेल्यानंतर इतर लोकही तिथे जातील. मग त्यांना आडवा. माझा जाण्याचा काय प्रश्न आहे? माझे चारित्र्य सर्वांना माहीत आहे. मी कुठेही दंगे करणारा माणूस नाही. जे दंगे करतात त्यांना तुम्ही संरक्षण देतात. त्यांचे सगळे एकतात. त्यांच्यामुळेच ही गडबड झाली आहे. इथल्या आमदारांना तुम्ही अटक केली पाहिजे. ज्या पद्धतीने त्या बोलतात सगळ्या दर्ग्यांना त्या थडगे म्हणतात, हे चुकीचे आहे. थडगं आणि दर्गा यात फरक आहे. थडगं काढणार आणि हनुमानाचे मंदिर बांधणार, असे म्हणणाऱ्यांना तुम्ही खरे म्हणजे अटक केली पाहिजे. पोलिसांमध्ये हिंमत असेल तर तुम्ही ते करा मला कशाला अटक करताय? असा सवाल दलवाई यांनी केला आहे. पुढे बोलताना हुसैन दलवाई म्हणाले, या परिसरात नेमके काय घडले होते तेच पाहण्यासाठी मी जात होतो. पण, मला तेच पाहू दिले नाही. मी तिथे घोषणाबाजी केली नाही. मी काहीही केले नाही. 350 वर्षांची ती दर्गा होती. ती तुम्ही उद्ध्वस्त करण्याचे कारण काय? ते हिंदू आणि मुसलमानांचे ऐक्य आहे. त्या दर्गेचे दोन ट्रस्ट हिंदू आहेत. तो वाद निर्माण केला असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

पान एक वरून

### बॉलीवूड स्टार्सची प्रॉपर्टीजमध्ये उलाढाल

भारत संग्राम | प्रतिनिधी

**मुंबई : बॉलिवूड कलाकार केवळ त्यांच्या चित्रपटांमुळेच नव्हे तर त्यांच्या मालमत्तेच्या व्यवहारांमुळेही चर्चेत राहतात. अलिकडेच, अक्षय कुमार, आमिर खान आणि सैफ अली खान यांनी त्यांच्या रिअल इस्टेट डीलने लक्ष वेधले आहे. कोणत्या अभिनेत्याने कुठे गुंतवणूक केली आणि त्याच्या निर्णयामागील कारण काय होते ते जाणून घेऊया.**

# बेलगाव मध्ये घराला भीषण आग

भारत संग्राम | प्रतिनिधी

**डोणगाव :** मेहकर तालुक्यातील बेलगाव मध्ये रोजगार सेवक यांच्या राहत्या घराला रात्री साधारण 1 च्या सुमारास आग लागली आग ऐवढी भयानक होती कि घराला अग्नीने भयानक तांडव निर्माण केली होती गावातील मुस्लिम समाजातील नागरिक शेख सैयदा भाई यांना माहिती मिळताच आग लागल्याचे लक्षात येताच .त्यांनी आरडाओरडा केला सुदैवाने उन्हाळा असल्याने हे कुटुंब रस्त्यावर झाडाखाली झोपलेली होती .त्यामुळे कोणत्याही प्रकारची जीवित हानी झाली नाही गावामध्ये दोन-तीन विहिरी असून महाजल नुसती नावाला उभी आहे. आणि तर दुसरीकडे जल मिशन यांचे काम अपुरे असल्याने विहिरीमध्ये एकही थेंब पाणी नसल्याने आग विझवण्यासाठी गावातील नागरिक रात्री धावपळ सुरू करत होती. मात्र





बेलगाव येथील मारुती बोरकर यांनी टँकर मध्ये भरलेल्या पाणी आणून एक मदतीचा हात दिला आणि आग आटोक्यात आणली .बेलगाव ग्रामपंचायत मध्ये निवृत्ती इंगळे वय साधारण 60 ते 65 वर्षे हे रोजगार सेवक म्हणून काम पाहता अक्षयच्या काही कागद आणि आपण केलेली कामे घरामध्ये राख झाली घरामध्ये रोजगार सेवक यांचा मोबाईल तसेच धान्य व काही पैसे जळून खाक झाले आता ते उघड्यावर आहे. या घटनेची माहिती कळताच गावातील पोलीस पाटील व तंटामुक्ती अध्यक्ष यांनी पाहणी करून तंटामुक्ती अध्यक्ष यांनी रोजगार सेवक निवृत्ती इंगळे यांना थोडी फारपैशाची मदत केली . घराला अचानक रात्री आग लागली या आधीच संपूर्ण घर आणि संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले या आगीत त्यांच्या मुलीचेही घर शेजारी असल्याने ते जळून खाक झाले त्या घरामध्ये लागणारे सर्व धान्य गहू ज्वारी डाळ व काही रोख रक्कम कानातील मशीन तसेच मोबाईल तेल भांडी किराणा इत्यादी वस्तू जळून पूर्णपणे खाक झाले आहे सुदैवाने या आगीत कोणत्याही जीवित आणि झालेली नाही मात्र सदर कुटुंब पूर्णपणे उघड्यावर आले आहे आगीचे नेमके कारण समजू शकले नाही तरी याबाबत पंचा समक्ष महसूल कर्मचारी अरुण आणि यांच्या उपस्थित पंचनामा करण्यात आला असून पुढील मदतीसाठी आवाज संबंधित विभागाला सादर केला जाणार आहे संकटग्रस्त कुटुंब उघड्यावर आले असून संसाराची राख रांगोळी झाली आहे त्यामुळे या कुटुंबाला शासनाने तात्काळ मदत देण्याची मागणी गावातील नागरिक करीत आहे तसेच मेहकर येथील स्थानिक आमदार सिद्धार्थ खरात यांनी फोन करून रोजगार सेवक यांना शासनापर्यंत त्यांच्या घराची माहिती देऊन त्यांना मदत देण्याची आश्वासन दिले आहे.

## परभणी जिल्ह्यात घुमला स्वरसम्राट' चा आवाज

भारत संग्राम | प्रतिनिधी

**मेहकर :** बुलढाणा२२ एप्रिल नागठाणा दिनांक २१एप्रिल २०२५ रोजी फुले आंबेडकर संयुक्त जयंती निमित्त स्वरसम्राट ' गायन संच,मेहकर यांचा प्रबोधनात्मक गायन कार्यक्रम, नागठाणा ता.शेलू जि.परभणी येथे संपन्न झाला.

यावेळी ' स्वरसम्राट ' गायन संच,मेहकर यांनी गीतांच्या माध्यमातून समाजप्रबोधन केले. कलावंतांनी महापुरुषांची गीते गाऊन श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.एकता,बंधुता, सामाजिक सलोखा, फुले आंबेडकर कार्य अशा विविध प्रबोधनपर गीतांनी कार्यक्रमात रंगत आणली. गायक शाहीर भिमराव अंभोरे, साहेबराव अंभोरे, दत्ता पवार, संदीप बोदडे, यांच्या सुरेल गायन व शेरोशायरीने उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी गायकांनी निळ्या



पाखरांची वंदना भिमराया, सोनियांची उगवली सकाळ, दोनच राजे, लाल दिव्याच्या गाडीला ,घेतो मोकळा श्वास भीमजयंतीमुळे, घालून सूट बुट टाय, तुम्ही खाता त्या भाकरीवर, कुणी नाही केलं भलं व माय भीमानं केलं, ही जयभीमवाली पोरं, रमाने हा पती घडविला , पहा पहा मंजुळा, मैं भीम का दिवाना हुं, भीम आवडीन बोले रामू रामू रमाईला अशी एक से बढकर एक गीते सादर केली.आकाश मोजतो आम्ही या गीतानंतर सरणतय गाथेने कार्यक्रमाची सांगता झाली.

कोरस पार्वता सुरडकर,आशा टेकाळे यांनी दिला.तर महाराष्ट्राचे प्रख्यात बॅन्जो वादक संदीप बोदडे,ढोलकपटू अशोक जावळे, राहुल पवार आणि हार्मोनियम वादक साहेबराव अंभोरे यांच्या तालबद्ध वादनाने कार्यक्रम दर्जेदार आणि बहारदार झाला.

कार्यक्रमाच्या आयोजन व यशस्वीतेसाठी राजू शेजुळ, अर्जुन शेजुळ,मच्छिंद्र शेजुळ, पंचशील नवयुवक मंडळ यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाला पंचक्रोशीतील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते. सामाजिक सलोखा व एकता यासाठी या गावाची ओळख आहे

## जनसेवेचा ध्यास घेतलेले ग्रामपंचायत पांगराबंदी/सोनखास येथील कर्मचारी

भारत संग्राम | प्रतिनिधी

➲ प्रदीप सावले

**मालेगांव :** पंचायत राज या त्रिस्तरिय रचनेमधील स्थानिक स्वराज्य संस्थेचा ग्रामपंचायत हा सर्वात महत्त्वाचा व शेवटचा घटक या ग्रामपंचायत मधील अत्यंत महत्त्वाचा दूवा म्हणजे ग्रामपंचायत कर्मचारी संपूर्ण गावाचा समन्वय व इत्यंभूत माहिती ग्रामपंचायत कर्मचारी यांचे पदरी असते ग्रामपंचायत पांगराबंदी/सोनखास येथे परिमंडळ संरचनेनुसार दोन पदे मंजूर असून मागील २३ वर्षांपासून दत्तराव माणिकराव खेडकर हे समर्थपणे ग्रा.पं.कर्मचारी पदाची धुरा सांभाळत आहेत.त्यांच्या जोडीला पंढरीनाथ चंद्रकांत घुगे हे मागील तीन वर्षांपासून पाणीपुरवठा कर्मचारी म्हणून आपली जबाबदारी



चोखपणे पार पाडत आहेत गावातील सर्व ग्रामस्थांना लागणारी सर्व कागदपत्रे वेळेवर उपलब्ध करून देणे,शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकारच्या योजना गरजू लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी दोन्ही कर्मचारी सदैव तत्पर असतात जनसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रिद ध्यानात ठेऊन ग्रामपंचायत मध्ये आलेल्या सर्व ग्रामस्थांचे हसतमुखाने स्वागत करुन त्यांच्या अडीअडचणी सोडविण्याच्या या दोन्ही कर्मचा-यांच्या वृत्तीबद्दल सरपंचा पार्वतीबाई सांगळे व सर्व ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

## छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्य बैठकीचे आयोजन

भारत संग्राम | प्रतिनिधी

**सिंदखेडराजा :** दिनांक २३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १०:३० वा शासकीय विश्रामगृह सिंदखेडराजा येथे १४ मे २०२५ रोजी साजरी होणाऱ्या छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीच्या माध्यमातून १८ पगड जातीधर्मातील बांधवांना सोबत घेऊन जयंती उत्सव साजरी करण्याचा बैठकीचा मूळ उद्देश आहे.या बैठकीत छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्याचा आणि विचारांचा गौरव, त्यांच्या जीवनातील महत्त्वपूर्ण घटना आणि कार्यांवर चर्चा करून उत्कृष्ट दर्जाचा जन्मोत्सव सोहळा पार कसा पाडता येईल याबाबत प्रत्येकाचे मत मांडण्यासाठी बैठक घेणे अगत्याचे आहे म्हणून बैठकीची आयोजन करण्यात आले आहे. तरी अखिल भारतीय छावा संघटनेचे बुलढाणा जिल्ह्यातील पदाधिकारी तसेच जिजाऊ भक्त, शिव शंभू भक्त यांच्यासह,या महापुरुषांच्या विचारवर कार्य करणाऱ्या विविध संघटनेतील पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन छावा संघटनेच्या वतीने जिल्हा अध्यक्ष अशोक राजे जाधव यांनी केले आहे.

## जळगाव जामोद तालुक्यात फिर्यादी च्या घरी नोंदविला पहिला ऑन द स्पॉट एफ आय आर

भारत संग्राम | प्रतिनिधी

➲ सचिन खंडारे

**बुलडाणा :** जिल्ह्यातील पोलिस प्रशासनाने सामान्य नागरिकांना जलद व प्रभावी न्याय मिळवून देण्यासाठी एक महत्त्वाची योजना सुरु केली आहे. 'ON THE SPOT FIR' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या योजनेची माहिती दिनांक ५ एप्रिल रोजी बुलडाणा येथे पोलिस अधीक्षक विश्व पानसरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या योजनेंतर्गत, बुलढाणा जिल्ह्यातील कुठल्याही पोलीस स्टेशनला मोबाईल अथवा गोपनीय माहितीच्या माध्यमातून दखलपात्र गुन्हा घडल्याची माहिती मिळाली, तर त्वरित पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि डीबी पथक घटनास्थळी दाखल होतील. त्यांच्या सोबत लॅपटॉप, स्कॅनर,प्रिंटरसह आवश्यक साधनांनी सज्ज असलेले शासकीय वाहन सोबत . या योजनेमुळे महिलांवर होणारे अत्याचार बालकांवरील गंभीर गुण निर्देशक नागरिकांवर अन्याय यासारख्या गंभीर गुन्हा मध्ये तात्काळ कारवाई होणार असून त्यामुळे घटनास्थळीच एफ आर ची नोंद होऊन तपासात वेळ न गमावता पुढील कारवाई शक्य होणार आहे. पोलीस अधीक्षक विश्व पानसरे यांच्या संकल्पनेतून जळगाव जामोद तालुक्यातील इलोरा या गावी तालुक्यातून पहिलीच ऑन द स्पॉट एफ आय आर दाखल करण्यात आली आहे. फिर्यादीने डायल ११२ नंबर वन कॉल करताच पोलीस फिर्यादीच्या घरी जाऊन तक्रार कर्त्याच्या घरी जाऊन दिनांक १८ एप्रिल रोजी रात्री ११ वाजुन ४७ मिनिटांनी पहिलाच एफ आय आर नोंदविण्यात आला आहे. ग्राम चावरा या गावी तक्रार कर्त्या महिलेला काही दिवसापासून आरोपी शिवशंकर गोपाळ भटकर हा वाईट नजर ठेवून होता. आरोपींनी दिनांक ११ एप्रिल रोजी फिर्यादीला तुझ्या नवऱ्याला सोडून दे माझ्यासोबत लग्न कर नाहीतर तुझ्या नवऱ्याला व मुलाला जीवाने खल्लास करून टाकीन अशी धमकी दिली होती. तसेच आरोपीने तक्रार करता महिलेचे वाईट उद्देशाने दोन्ही हात पकडून तू माझ्याशी लग्न करते का नाही अशी बोलून शिवीगाळ करत तुला व तुझ्या कुटुंबाला गावात राहू देणार नाही व माझे जीवाचे काही पण बरे वाईट करून खोट्या केस मध्ये फसवून टाकीन अशी धमकी दिली तसेच आरोपीची आई सुरेखा बाई गोपाळ भटकर हिने फिर्यादी असलेल्या महिलेच्या घरासमोर जाऊन शिवीगाळ केली. त्यामुळे फिर्यादी महिलेने पोलीस स्टेशनच्या लँडलाईन वर कॉल करून माहिती दिली माहितीवरून घटनास्थळावर पोलीस उपनिरीक्षक अमोल पंडित व महिला पोलीस उपनिरीक्षक शेडगे मॅडम यांनी घटनास्थळी जाऊन ईमेल द्वारे पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद करून आरोपींविरुद्ध अप नं २२९/२०२५ कलम ७४ ,११५(१),३५२,३५१(२)३(५) भारतीय न्याय साहित्य नुसार गुन्हा दाखल करण्यात आला तसेच घटनास्थळीच संपूर्ण तपास करून आरोपीस अटक करून २४ तासाच्या आत आरोपी विरोधात विद्यमान न्यायालयात १०८/२०२५ दोषारोप पत्र दाखल करून आरोपी विरोधात तपास बीट अधिकारी महिला पोलीस उपनिरीक्षक शेडगे मॅडम यांनी २४ तासाच्या आत पूर्ण केला. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, अप्पर पोलीस अधीक्षक श्रेनिक लोढा उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व जळगाव जामोद पोलीस निरीक्षक श्रीकांत निचळ यांच्या आदेशाने करण्यात आली.

## सौरभ हटकर यांना राज्यस्तरीय युवा संघर्ष योद्धा पुरस्कार

भारत संग्राम | प्रतिनिधी

➲ सचिन खंडारे

**बुलडाणा :** राष्ट्रीय समाज पक्ष आयोजित, माजी मंत्री महादेव जानकर यांच्या जन्मदिना प्रित्यर्थ सावित्रीबाई फुले सभागृह, गंजपेठ पुणे येथे दिनांक 20 एप्रिल 2025 रोजीराज्यस्तरीय युवा संघर्ष परिषद आयोजित करण्यात आली होती. सदर परिषदेला प्रहार पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू शेट्टी यांच्या प्रमुख उपस्थिती मधे आयोजित करण्यात आली होती. या परिषदेमध्ये महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या युवकांचा सत्कार करण्यात आला आहे. यामध्ये सौरभ हटकर यांना राज्यस्तरीय युवा संघर्ष योद्धा पुरस्कार प्रदान करण्यात आला यांचबरोबर, सांगली चे अनिल पवार, विक्रम ढोणे, पत्रकार दत्तात्रय खंडागळे, नितीन आंधळे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. सौरभ हटकर



हे सध्या युनिव्हर्सिटी ऑफ एडीनबर्ग स्कॉटलंड येथे मेंढपाळ विषयावर पी एच डी करीत असून, मेंढपाळ पुत्र आर्मी संघटनेच्या माध्यमातून मागील 10 वर्षांपासून पशुपालक समूहाच्या अधिकारी आणि हक्कांसाठी लढत आलेले आहे. सौरभ हटकर यांनी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय चंद्रपूर येथून कॉम्प्युटर सायन्स मध्ये पदवी तर मुंबई येथील टाटा सामाजिक विज्ञान संस्था (टीस) येथून सामाजिक कार्यात पदव्युत्तर पदवी घेतलेली आहे. सौरभ हटकर यांनी शिवराय फुले शाहू आंबेडकर होळकर या पुरोगामी विचारांवर राज्यभरात आता पर्यंत 200 व्याख्यानाच्या माध्यमातून प्रबोधन केलेले असून, वक्तृत्व आणि रस्त्यावरची आंदोलने ही हटकर यांच्या जमेच्या बाजू आहेत. त्यांनी मेंढपाळ पशुपालक समूहासाठी केलेले ग्रेझिंग कॉरिडॉर आंदोलन असो की मेंढपाळ टपाल सत्याग्रह असो की धनगर समाजा साठी सरकारच्या विविध योजना असोत. त्यासाठी हटकर यांनी अभ्यासू आणि वैशिष्ट पूर्ण आंदोलने केलेली आहेत. या आंदोलनामुळे आणि त्यांच्या उच्च शिक्षणामुळे हटकर यांचा नुकताच लंडन येथे निसाऊ यूके आणि ब्रिटिश कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित Achievers 2024 म्हणून फेब्रुवारी मध्ये ब्रिटिश संसदेत सन्मान करण्यात आलेला आहे. हटकर यांच्या कार्याची दखल घेऊन, राष्ट्रीय समाज पक्षाने महादेव जानकर यांच्या जन्मदिना निमित्त आयोजित युवा संघर्ष परिषदे मध्ये युवा संघर्ष योद्धा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. पुरस्काराला उत्तर देताना हटकर यांनी महादेव जानकर यांनी महाराष्ट्राचे कांशीराम व्हा असे आवाहन करतानायेणाऱ्या काळातील राज्यातील विरोधी पक्षाची सक्षम भूमिका महादेव जानकर, राजू शेट्टी, आणि बच्चू कडू निभावू शकतात ही भूमिका मांडली. पुढे बोलताना हटकर यांनी धनगर बहुजन समाजातील युवकांना इंग्रजी शिकण्याचे आवाहन केले तसेच ढोल वाजवणारा समाज घडवायचा नसून, व्यवस्थेला ढोलासारखा बडवणारा समाज घडविण्यासाठी प्रयत्न करूयात असा विश्वास ही व्यक्त केला. त्यांच्या या पुरस्कारा बद्दल त्यांचे विविध स्तरावरून अभिनंदन होत आहे.

## थोडक्यात




### रहेमान नवरंगाबादी व भगवानराव कोकाटे यांना जयहिंद सेवाभावी संस्थेचे महाराष्ट्र गौरव पुरस्कार जाहीर

भारत संग्राम | प्रतिनिधी

**लोणार :** लोणार तालुका पत्रकार संघाचे सदस्य तथा पत्रकार रहेमान नवरंगा बादी व समाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भगवानराव कोकाटे यांना जयहिंद सेवाभावी संस्था आयोजित २०२५ महाराष्ट्र गौरव पुरस्कार पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. जयहिंद सेवाभावी संस्था आयोजित २०२५चे महाराष्ट्र गौरव . पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारासाठी पुरस्कारासाठी महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात कार्य करणा-या ३३ व्यक्तींची निवड करण्यात आली आहे या रा पुरस्काराचे वितरण वर्धा येथे ४ मे २०२५ रोजी राज्यांच्या मंत्र्याच्या उपस्थिति व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सत्तार इनामदार यांनी दिली आहे. जयहिंद सेवाभावी शिक्षण संस्थेच्या वतीने विविध क्षेत्रातील ३३ व्यक्तींना हे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारासाठी पत्रकारेतून उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल लोणार तालुक्यातून लोकमत शहर प्रतिनिधी रहेमान नवरगाबादी यांच्यी निवड करण्यात आली असून समाजिक व राजकीय शैक्षणिक क्षेत्रातून उल्लेखनीय कार्य करणारे सरपंच,तथा कृषि उत्पन्न बाजार समिति संचालक, बिरसा क्रांति दलाचे जिला अध्यक्ष,भगवानराव कोकाटे यांची निवड करण्यात आली. मानव सेवा हीच ईश्वर सेवा' ह्या त्रीदवाक्याचे ध्येय समोर ठेवून जय हिंद सेवाभावी संस्थेच्या वतीने यांच्या वर्धापनदिना निमित्त सामाजिक, शैक्षणिक, आणि वृत्तपत्रातील काम करणाऱ्या काही व्यक्तिमत्त्वाचा पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. आपणास या समाजाचे काहीतरी देणे लागतो. या उद्देशाने निस्वार्थ कर्म करण्यासाठी परिवर्तनाचा ध्यास घेऊन जय हिंद सेवाभावी परिवाराचे कार्य चालू आहे. गेल्या अठ्ठवीस वर्षांपासून या जयं हिंद सेंवाभावी परिवाराने सेवावृत्तीचे बीज पेरले गेले आहे. म्हणून आज सेवाव्रतीच्या बांधिलकीतून नवचैतन्यानी जय हिंद सेवाभावी परिवाराचा मळा बहरलेला फुलला लला आहे. वृत्तपत्राच्या माध्यमातून जनसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडून त्यांना आपल्या लेखणीच्या माध्यमातून न्याय देण्याची सैदव भुमिका जोपासणारे रहेमान नवंरगाबादी यांना व राजकीय क्षेत्रतुन काम करणारे भगवान कोकाटे यांना संस्थेचे अध्यक्ष अब्दुल सत्तार इनामदार यांनी जयहिंद सेवाभावी संस्थेचे महाराष्ट्र गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.



### पशुपालकांनी शाश्वत व्यवसायासाठी अत्याधुनिक चारा तंत्रज्ञानाचा अवलंब करावा - डॉ. नितीन पाटील, कुलगुरु माफसू

भारत संग्राम | प्रतिनिधी

**नागपूर ::** तांत्रीक ज्ञान आणि कौशल्यासह पुशपालकांना सक्षम करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर जसे की, पशुधनाच्या पौष्टीक गरजा पूर्ण करण्यासाठी कुरण विकास, पिकाच्या उरलेल्या अवशेषांपासुन संपुर्ण खाद्याचे ठोकळे तयार करणे, चारा टंचाईच्या काळात काटेविरहीत निवडुंगाची हिरवी वैरण म्हणुन वापर करणे असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन पाटील यांनी केले. महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, दुधबर्डी, नागपूर आणि सेंटर फॉर पिपल्स कलेक्टिव्ह यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय कार्यशाळा व पशुपालक-शास्त्रज्ञ संवाद कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर संचालक, शिक्षण व अधिष्ठाता, पशुविज्ञान डॉ. शिरीष उपाध्ये, संचालक संशोधन डॉ नितीन कुरकुरे, संचालक विस्तार शिक्षण डॉ अनिल भिकाने, नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ आरजु सोमकुवर, सेंटर फॉर पिपल्स कलेक्टिव्ह चे संचालक श्री सजल कुलकर्णी आणि अजिंक्य शहाणे,कृषि विज्ञान केंद्र, दुधबर्डी, नागपूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ आणि प्रा. डॉ सारीपुत लांडगे आदी मान्यवर उपस्थित होते. गवळाऊ पैदासकार संस्थेचे अध्यक्ष श्री पुष्पराज कालोकार, अमरावती जिल्हा गवळी समाजाचे अध्यक्ष श्री खडके, उमरखेड येथील बंदी भाग विकास समितीचे अध्यक्ष बाबुसिंह जाधव, रबारी समाजाचे मशरु रबारी, भरवाड समाजाचे रामजी जोगराणा, रामटेक येथील महिला बतचगटासाठी पशुपालन प्रशिक्षणावर काम करणारे एकनाथ गजभिये व वराहपालन संस्थेचे अध्यक्ष विक्की बढेल यांना पशुसंवर्धन व पशुपालन क्षेत्रात केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. विविध पशुपालक समुहातर्फे श्री संजय गायन, मशरु रब्बारी, संतोष गवळे, विक्रम परमार, रोहित खैरवार, प्रफुल्ल कालोकार, समीक्षा गणवीर, श्री सजल कुलकर्णी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संचालक विस्तार शिक्षण डॉ अनिल भिकाने यांनी शास्त्रोक्त पशुसंगोपनावर मार्गदर्शन केले. डॉ. संदीप चौधरी, डॉ. शिल्पश्री शिंदे आणि डॉ. शेखर बढे यांनी रेबीज आणि दुध जनजागृती अभियानासंबंधी मार्गदर्शन केले. डॉ. सारीपुत लांडगे यांनी प्रास्ताविक सादर केले तर कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन डॉ. श्वेता लेंडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता डॉ. गजानन अंभोरे, डॉ. अतुल ढोक, डॉ. गितांजली ढुमे, श्री आजिंक्य शहाणे, प्रवीण बागडे, इंजि. राजेंद्र सावरकर, श्री मोहन कापसे, श्री मोहन गौतम आणि गौरी भदोरिया यांनी अथक परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमात मोठया प्रमाणात पशुपालकांनी सहभाग नोंदवला. ज्यामध्ये उमरखेड, मेळघाट, वर्धा, रामटेक, कुही, भिवापूर या भागातील विविध पशुपालक समाजातील 120 पशुपालक उपस्थित होते.

# वेळेत दुरुस्ती न केल्यास केबल काढण्याचा इशारा गड्डे बुजवण्याचे काम सुरू!

## दै. भारत संग्राम वृत्तपत्रातील बातमीची दखल घेत प्रशासनाचा ठेकेदारास दणका

भारत संग्राम | प्रतिनिधी

➔ प्रदीप सावले






**मालेगांव :** मेहकर–मालेगाव राष्ट्रीय महामार्गावर सुरू असलेल्या आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या नियमबाह्य केबल खोदकामाची 'दै भारत संग्राम च्या बातमीच्या आधारे तात्काळ दखल घेण्यात आली असून,मालेगावचे तहसीलदार श्री.दीपक पुंडे यांनी स्वतः घटनास्थळी पाहणी करून याबाबत संबंधित विभागाशी संपर्क साधत त्वरित कारवाईस प्रारंभ केला आहे गंभीर सूचना केबलच काढून टाकण्याचा इशारा या प्रकरणी अमरावती येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे डेप्युटी इंजिनिअर उमेश बागुल यांनी अधिकृत पत्राद्वारे कार्यवाही सुरू केली आहे या पत्रात,वोडाफोन कंपनीच्या कंत्राटदारास स्पष्ट शब्दांत सूचित करण्यात आले आहे की,खोदलेला रस्ता नियमबाह्य असल्याने विहित मुदतीत रस्त्याची पूर्ण दुरुस्ती न केल्यास,विभाग स्वतः केबल काढून टाकण्याची कारवाई करेल साईट पट्ट्यांवरील खड्ड्यांची दबाई सुरू तहसीलदार पुंडे साहेबांच्या मार्गदर्शनानंतर आणि अमरावती विभागाच्या सक्त सूचना देण्यात आल्यानंतर,संबंधित ठेकेदाराने खड्डे बुजवण्याचे आणि साईड पट्ट्यांची दबाई करण्याचे काम तातडीने सुरू केले आहे रोडवर दबाईसाठी रोलरिंग मशीन लावण्यात आले असून,वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही यासाठी काळजी घेतली जात आहे प्रशासनाची सक्रियता आणि जनतेच्या सुरक्षेची दखल संपूर्ण प्रकरणात प्रशासनाची तत्परता वाखाणण्याजोगी आहे गेल्या काही दिवसांपासून संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही माहिती उपलब्ध होत नव्हती. मात्र, दै भारत संग्राम ने या बातमीला प्राधान्य देत मुद्देसूद वृत्त मांडल्यानंतर प्रशासन खडबडून जागे झाले केवळ दखलच घेतली नाही,तर तात्काळ हालचाली करून जबाबदाऱ्यांची जाणीव करून दिली आहे. आता हे प्रश्न उरतातच भविष्यात असे काम सुरू करण्यापूर्वी प्रशासनाकडून नियमांचे पालन होणार का? आणि सर्वात महत्त्वाचे आता का होईना,पण हा ठोस प्रतिसाद कायमस्वरूपी अंमलात येणार का? या ठिकाणी ठामपणे सांगावे लागेल की,बातमीचा प्रभाव जनतेसाठी आश्वासक ठरतो तेव्हाच पत्रकारितेचे खरे मोल अधोरेखित होते.

## सुनीता जाधव यांची बंजारा परिषदेच्या महिला विदर्भ संघटकपदी निवड

भारत संग्राम | प्रतिनिधी

➔ प्रदीप सावले



**मालेगाव :** किन्हिराजा राष्ट्रीय बंजारा महिला परिषदेच्या विदर्भ महीला संघटक या पदावर महीला चळवळीच्या नेत्या सुनीता किशोर जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे राष्ट्रीय बंजारा परिषद ही संघटना धर्म नेता किसन राठोड यांच्या मार्गदर्शनात राज्यात. काम करीत असून वाशीम जिल्ह्याचे काम महिला आघाडीच्या मुलुख मैदानी तोफ सीमा प्रकाश राठोड या काम पाहत असुन महिला सक्षमी करण्यात सतत प्रकाशझोतात असणाऱ्या सुनीता किशोर जाधव यांची बंजारा परिषदेच्या महिला आघाडीच्या विदर्भ संघटक पदावर नियुक्ती करण्यात आली असून बंजारा परिषदेच्या ध्येयधोरनानुसार आपण कार्य करणार असून महिलानच्या हक्कासाठी सदैव लढणार असून बंजारा महीला राष्ट्रीय परिषदेने दिलेली जबाबदारी आपण पुर्ण ताकतीने फार पाडणार असल्याची ग्वाही नवनिर्वाचित विदर्भ महीला संघटक सुनीता किशोर जाधव यांनी दिली आहे.

## लोणार तालुक्यात पीक विम्याचा सावळा गोंधळ; उर्वरित शेतकऱ्यांना लवकरात लवकर पिक विमा द्या

भारत संग्राम | प्रतिनिधी

➔ सचिन खंडारे



**बुलडाणा :** लोणार तालुक्यात 2023- 2024 चा खरीप व रब्बी हंगामाचा पिक विमा काही शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाला आहे तर काही शेतकरी आजही पीक विम्याच्या प्रतीक्षेत आहे तरी उर्वरित शेतकऱ्यांच्या खात्यात लवकरात लवकर पीक विम्याची रक्कम जमा करण्याच्या मागणीसाठी सहदेव लाड यांनी लोणार तालुका कृषी अधिकारी व तालुका विमा प्रतिनिधी यांची भेट घेतली, तालुक्यात काही शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम योग्य प्रमाणात आली तर काही शेतकऱ्यांच्या खात्यावर अत्यंत कमी प्रमाणात पीक विम्याची रक्कम आली तर आजही काही शेतकऱ्यांना पिक विमा आला नाही त्यासंबंधी आज क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष सहदेव लाड यांनी लोणार तालुका कृषी अधिकारी व विमा प्रतिनिधी यांची भेट घेऊन पिक विमा पासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांच्या पिक विमा संबंधी चर्चा केली यावेळी तालुका कृषी अधिकारी व विमा प्रतिनिधी यांनी विमा कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली व लवकरच पिक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना मिळणार असल्याचे आश्वासन दिले यावेळी पीक विम्याची रक्कम लवकर शेतकऱ्यांना न मिळाल्यास लोणार तालुका कृषी अधिकारी कार्यालय समोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सहदेव लाड यांनी दिला यावेळी अनिल लांडगे संजय महाजन व इतर शेतकरी उपस्थित होते

## मराठवाड्यात जाणाऱ्या दोनच बस फेऱ्या, आता उमरगा शेगाव विशेष बस फेरी सुरू

भारत संग्राम | प्रतिनिधी

➔ प्रदीप सावले



**मालेगाव :** लग्नसराई,गर्दी तथा सामाजिक कार्यकर्त्यांची मागणी लक्षात घेता उमरगा आगाराच्या वतीने उमरगा शेगाव ही विशेष बस फेरी सुरू करण्यात आली आहे बसचा वाहन चालकाचा शिरपूर येथील नागरिकाच्या वतीने रविवारी शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला अकोल्या कडून रिसोड मार्गे मराठवाड्यात जाणाऱ्या केवळ दोनच बस फेऱ्या होत्या त्यामुळे सेनगाव,कनेरगाव,येलदरी,जिंतूर परभणी कडे जाणाऱ्या प्रवाशांना अडचणीचा सामना करावा लागत होता आता लग्न सराई व प्रवाशांची वाढती गर्दी असल्याने सामाजिक कार्यकर्ते गणेश इरतकर व दिलीप विश्वंभर यांनी केलेली मागणी लक्षात घेऊन राज्य परिवहन महामंडळ लातूर विभागाचा उमरगा आगारातून उमरगा शेगाव ही विशेष बस सेवा अंतर्गत ही बस फेरी सुरू करण्यात आली आहे. रविवारी ही बस शेगाव येथून उमरगाकडे मार्गस्थ झाली असता शिरपूर बस स्थानक परिसरात पोहचल्या नंतर सकाळी पावणे नऊ वाजता दरम्यान गावातील सामाजिक कार्यकर्ते गणेश इरतकर,दिलीप विश्वंभर,प्रतिष्ठित व्यापारी सुरेंद्र कदम,रमेश गाभणे,गणेश ठाकूर,विलास गावंडे,अरुण गाभणे,बबन भांदुर्गे,अशोक डहिवाले,शंकर वाघ यांनी बसचा चालक वाहकाचा शाल श्रीफळ व पुष्पहार घालून सन्मान केला या बस फेरीमुळे शेगाव सह रिसोड,जिंतूर,परभणी,लातूर,उमरगा तथा कर्नाटक कडे जाणाऱ्या प्रवाशांची सुविधा झाली आहे यावेळी बस चालकांनी आपण चांगल्या प्रकारची बस सेवा प्रवाशांना देऊ मात्र शिरपूर बस स्थानक परिसरात बस वळवितांना होणारी अडचण दूर करण्यात यावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

## पेण मधील दातार आळीतील पारंपारिक वासंतिक हळदी कुंकू समारंभ संपन्न

भारत संग्राम | प्रतिनिधी



**पेण :** दरवर्षी नावीन्यपूर्ण विषय घेऊन चैत्र गौरीला सजावट करायच्या परंपरेला अनुसरून या वर्षीही हस्तकला या विषयावर आधारित आरास करून दातार आळीतील भगिनींनी चैत्र गौरीला सजवले होते . मोबाईल हातात आल्यापासून बायकांना मोबाईल शिवाय दुसरे काही दिसत नाही हा समज साफ खोटा ठरवत मोबाईलचाच सुयोग्य वापर करून निरनिराळ्या कलात्मक वस्तू बनवता येतात याचे उत्तम उदाहरण आज या भगिनींनी घालून दिले . विणकाम , भरतकाम , वारली चित्रकला , बांधणी , बाटिक , ओरीगामी , मोत्याच्या वस्तू , हलव्याचे दागिने , शाळेत शिकलेल्या हस्तकलेच्या वस्तू इत्यादी पारंपारिक कलांबरोबरच ग्लास पेंटिंग , टेराकोटा ज्वेलरी , फॅब्रिक ज्वेलरी , टाकावू पासून टिकावू वस्तू इत्यादी वस्तुंचा सजावटी मध्ये समावेश होता . जणूकाही कोण नववधूचे रुखवत मांडले आहे की काय असा भास होत होता . आळीतील बऱ्याचशा महिलांनी स्वतः पेंटिंग केलेल्या साड्या परिधान केल्या होत्या आणि स्वतः तयार केलेले दागिने घातले होते . नोकरी करणाऱ्या , गृहिणी , विद्यार्थिनी , आळीतल्या माहेरवाशिणी सगळ्या जणी दीड दोन महिन्यांपासून या समारंभासाठी तयारी करत होत्या . पारंपारिक वासंतिक हळदी कुंकू समारंभात असणारे आंबेडाळ , बत्तासा , कैरीचे पन्हे , हरभऱ्याची ओटी या बरोबरच हळदीकुंकवाला आलेल्या प्रत्येकीला एक चिठ्ठी उचलून त्या चिठ्ठीत असलेली वस्तू भेट म्हणून दिली . विशेष म्हणजे सजावटीच्या वस्तू आणि भेट वस्तू या सर्व वस्तू दातार आळीतील भगिनींनी स्वतः हाताने तयार केलेल्या होत्या . ध्यानीमनी नसताना अशी भेटवस्तू मिळाल्यामुळे समत महिला वर्ग विशेष आनंदी होता आणि सेल्फी पॉइंट वर भरपूर फोटो काढून आनंद व्यक्त करत होता .

# दाखल्यांची शाळा उपक्रमासाठी दरेगाव चे सुपुत्र मंडळ अधिकारी जनार्दन बंगाळे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मानित

भारत संग्राम | प्रतिनिधी

➔ सचिन खंडारे




**बुलडाणा :** दिनांक 21 एप्रिल रोजी सह्याद्री राज्य अतिथी सभागृह, मुंबई येथे सामान्य प्रशासन विभाग महाराष्ट्र शासन तर्फे नागरी सेवा दिना निमित्त राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती ) अभियान व स्पर्धा सन 2023-24 व सन 2024-25 पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. या पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये दाखल्यांची शाळा या उपक्रमासाठी जनार्दन बंगाळे मंडळ अधिकारी यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. प्रमाणपत्र सन्मानचिन्ह आणि पन्नास हजार रुपये असं या पुरस्कारातील स्वरूप आहे. मूळचे बुलढाणा जिल्ह्याचे भूमिपुत्र असलेले बंगाळे हे सिंदखेड राजा तालुक्यातील दरेगाव येथील रहिवासी आहेत. यापूर्वी त्यांना उत्कृष्ट तलाठी म्हणून पुरस्कार मिळाला आहे. जळगाव जिल्ह्यातील खिरोदा तालुका यावल येथे मंडळ अधिकारी म्हणून कार्यरत असताना त्यांनी 'दाखल्यांची शाळा 'हा उपयुक्त उपक्रम राबविला होता.

शाळा, महाविद्यालय मध्ये प्रवेश, शिष्यवृत्तीचा लाभ, सरकारी नोकरी साठी अर्ज दाखल करणे यासाठी जातीचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, उत्पत्र प्रमाणपत्र इत्यादी दाखल्यांची आवश्यकता असते. या दाखल्या बाबत पुरेसी माहिती विद्यार्थ्यांना नसते व त्यामुळे जेव्हा शाळा, महाविद्यालय यांच्याकडून प्रवेशासाठी अथवा शिष्यवृत्तीसाठी या दाखल्यांची मागणी करण्यात येते तेव्हा विद्यार्थी व पालक यांची धावपळ सुरु होते. त्यामध्ये जातीचे जुने पुरावे शोधण्यापासून ते अर्ज दाखल करण्यापर्यंतच्या सर्व बाबींचा समावेश आहे. यात काही वेळा मध्यस्थ व्यक्तीकडून आर्थिक लुबाडणूक केली जाते. असा सर्व सामान्य अनुभव आहे. त्यामुळे शालेय स्तरावरच दाखले नोंदणीचे शिबीर आयोजित करून दाखल्यांचे वितरण करण्यासाठी जे. डी. बंगाळे मंडळ अधिकारी यांनी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मध्ये उन्हाळी सुट्टीत दाखल्यांची शाळा हा उपक्रम राबवला होता.

सदर उपक्रमास महाराष्ट्र शासनाचा राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा, सन 2023 मध्ये कर्मचारी श्रेणी मध्ये पुरस्कार घोषीत करण्यात आला आहे. या उपक्रमातून ग्राम महसूल अधिकारी यांचे स्तरावरील उत्पन्न अहवाल व शाळेकडील बोनाफाईड प्रमाणपत्र मिळून ४७६ दाखले विद्यार्थ्यांना जागेवर उपलब्ध करून देण्यात आले. जातीचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र इत्यादी मिळून ६८० दाखल्यांची नोंदणी करण्यात आली. विद्यार्थ्यांना दाखले वितरण करण्यात आले. यामुळे शासकीय सेवांचा लाभ विद्यार्थ्यांना गाव पातळीवर एकाच छताखाली मिळाला, विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या दाखल्यांची नोंदणी करण्यात येऊन 1156 दाखल्यांचे वितरण करण्यात आले.

त्यांच्या या उपक्रमाची राज्यभर अंमलबजावणी सुरू झाली आहे. त्यांच्या या कामगिरीबद्दल समाजातील विविध स्तरातून त्यांचे कौतुक होत असून जिल्हाधिकारी कार्यालयाने सुद्धा त्यांचा सत्कार केला आहे. तसेच विदर्भ पटवारी संघ नागपूर जिल्हा शाखा बुलढाणा चे जिल्हाध्यक्ष विजेंद्र धोंडगे व जिल्हा सचिव शिवानंद वाकदकर यांच्या कडून त्यांचे विशेष अभिनंदन करण्यात आले आहे.





दैनिक

# भारत संग्राम

सत्याचा बुलंद आवाज

## विदर्भात अग्रगण्य अशा दैनिक भारत संग्राम वृत्तपत्रासाठी खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे

**वृतपत्रमध्ये काम केल्याचा अनुभव आवश्यक**

## खालील जिल्ह्यात जिल्हा पातळीवर/तालुका पातळीवर प्रतिनिधी नियुक्त करणे आहे

**अमरावती**
अंजणगाव, सुर्जी, वरुड, तिवसा, मोर्शी, धामणगाव रेल्वे, चांदुर रेल्वे, धारणी, भातकुली, चिखलदरा

**यवतमाळ**
उमरखेड (तालुका) प्रतिनिधी, झरी जामणी, घाटंजी (शहर ) प्रतिनिधी, आर्णी (शहर) प्रतिनिधी, केळापूर,दारव्हा, नेर, पुसद (शहर) प्रतिनिधी, बाभुळगाव, महागांव (शहर ) प्रतिनिधी, मारेगांव, वणी

**वाशिम**
कारंजा, मंगरुळपीर, मानोरा, मालेगाव, रिसोड

**अकोला**
अकोट (शहर) प्रतिनिधी
तेल्हारा, बाळापूर, पातूर, हिवरखेड, बार्शीटाकळी

**बुलढाणा**
चिखली, देउळगांव राजा, जळगाव, जामोद, मलकापूर, मोताळा, नांदुरा, खामगाव, शेगांव, मेहकर, सिंदखेड राजा, लोणार

**वर्धा** आष्टी, देवळी, सेलू, आर्वी, समुद्रपूर, कारंजा, घाडगे

**चंद्रपूर** भद्रावती शहर प्रतिनिधी, वरोरा, चिमूर, नागभीड, ब्रम्हपुरी, सिंदेवाही, मुल, गोंडपिपरी, राजुरा, सावली, कोरपना, जिवती

मुख्य संपादक
**माधव आ. हिवाळे**
मो.नं. 9765332897
epaper.bharatsangram.online